रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ ▌अंक १२२ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ९ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹

## ओमानमध्ये अडकलेल्या भारतीयांची सुटका

**मुंबई :** ओमानमध्ये अडकलेल्या आणि गंभीर अडचणींना सामोरे जाणाऱ्या ३६ भारतीय कामगारांची सुटका करण्यात भारताला यश आले आहे. संबंधित कामगार चांगल्या नोकरीच्या शोधात ओमानमध्ये गेले होते. मात्र, नियुक्ती केलेल्या संस्थांकडून कामगारांवर अत्याचार करण्यात येत होते. हा प्रकार समोर येताच भारत सरकारने ओमानमधील भारतीय दूतावासाच्या मदतीने असहाय्य झालेल्या कामगारांची सुटका केली. ओमानमध्ये १८ भारतीय कामगारांची नियुक्ती केलेल्या संस्थांकडून कामगारांचे शोषण केले जात असल्याची माहिती उत्तर मुंबईतील एका भाजपच्या पदाधिकाऱ्याने केंद्रीय मंत्री व उत्तर मुंबईचे खासदार पीयूष गोयल यांना दिली होती. संबंधित कामगार हे ओमानमध्ये चांगल्या रोजगाराच्या संधीच्या शोधात गेले होते.

## अभिनेता प्रियांशु क्षत्रिय याची हत्या

**नागपूर :** हिंदी चित्रपटातील कलाकार प्रियांशू क्षत्रिय उर्फ बाबू छत्री याची हत्या झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. झुंड चित्रपटात प्रियांशु याने महानायक अमिताभ बच्चन यांच्यासोबत काम केले होते. या चित्रपटात त्याने बाबू छत्री ही भूमिका साकारली होती. या चित्रपटातील त्याचा विनोदी अभिनय प्रेक्षकांच्या चांगलाच स्मरणात राहिला होता. त्यामुळे प्रियांशुच्या हत्येच्या घटनेने अनेकांना मोठा धक्का बसला. प्राथमिक माहितीनुसार, प्रियांशू क्षत्रिय याची नागपूरमध्ये जरीपटका भागात हत्या झाली. प्रियांशूचा मित्र ध्रुव साहू यानेच त्याचा खून केला. प्रियांशु क्षत्रिय आणि ध्रुव साहू यांच्यात मंगळवारी दारुच्या नशेत वाद झाला होता. त्यावेळी ध्रुव साहू याने प्रियांशूवर धारदार शस्त्राने वार करुन त्याला जखमी केले. या हल्ल्यानंतर बाबू छत्री याला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले.

## वे|ध|क

### गाडी ३० फुटांवरून थेट समुद्रात

**मुंबई :** मुंबई- सागरी मार्गावर (कोस्टल रोड) भरधाव वेगाने जाणाऱ्या मद्यपी वाहनचालकाचे नियंत्रण सुटल्याने त्याची गाडी लोखंडी कुंपण तोडून थेट पाण्यात गेली. त्याला वाचविण्यात यश आले आहे. रविवारी रात्री सागरी मार्गाजवळील वरळी येथे ही घटना घडली. या धडकेत सागरी मार्गाच्या लोखंडी कठड्याचेही नुकसान झाले. वरळी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सोमवारी रात्री ११ च्या सुमारास सागरी किनारा मार्गावरून फरगोश बत्तीवाला (१९) हा तरुण भरधाव वेगाने वाहन चालवत होता. तो महालक्ष्मी येथून वरळीच्या दिशेने चालला होता. वरळीनजीक पुलावर त्याचे नियंत्रण सुटले आणि त्याची गाडी संरक्षक कठड्याला जाऊन आदळली. त्याच्या गाडीचा वेग प्रचंड होता. त्यामुळे गाडी संरक्षक कठडा तोडून पाण्यात पडली.

### साडेपाच लाखाचे दागिने लंपास

**रोहा :** बाहेरगावी गेल्याने घरात कुणीही नाही या संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करुन घरातील रोख रक्कम व सोन्याचे दागिने व अन्य किंमती दस्तऐवज चारून नेल्याची घटना चणेरा-कोकबन मार्गावरील पारंगखार गावात घडली. पारंगखार गावातील तरुण प्रमोद शेळके यांचे आई, वडील, पत्नी व भाऊ असे संपूर्ण शेळके परिवार घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. या संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कडी कोयंडे तोडून आत प्रवेश केला. तसेच कपाटातील लॉकरचा दरवाजा उपकून त्यातील साडेतीन लाख रुपयांची रोख रक्कम, मंगळसूत्र, हार, कानातील डूल, झुमके, अंगठ्या तसेच आधारकार्ड, पॅनकार्ड व बँक पासबुक घेऊन पोबारा केला.

### अकरावीचे वर्ष अभ्यासातूनच वजा !

**पनवेल :** मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुरू झालेली अकरावी प्रवेश प्रक्रिया अद्यापही संपली नसून अकरावी फेरी सुरू आहे. या फेरीतही राज्यातील जवळपास ५ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. अकरावीच्या वर्गांसाठी २२० दिवस अध्यापन होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात दोन ते तीन महिने म्हणजे ६० ते ९० दिवसच सगळ्या विद्यार्थ्यांसाठी अध्यापनाचे असतील. यंदा दहावीचा निकाल लवकर जाहीर झाल्यामुळे अकरावीची प्रवेश प्रक्रियाही मे अखेरीस सुरू झाली. तेव्हापासून अद्यापपर्यंत प्रवेश प्रक्रिया सुरूच आहे. पन्नास टक्के प्रवेश झाल्यानंतर महाविद्यालय सुरू करण्याची मुभा शिक्षण विभागाने दिली आहे. ११ ऑगस्टपासून राज्यातील अकरावीचे वर्ग सुरू झाल्याचा दावा शिक्षण विभागाने केला.

### संपातील वीजपुरवठ्यासाठी महावितरण सज्ज

**मुंबई :** महावितरणमधील सात वीज कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीने संप पुकारला आहे. या तीन दिवसीय संपाच्या कालावधीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून आपत्कालिन नियोजन बुधवारी (दि. ८) पूर्ण झाले असून राज्यभरातील यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी यंत्रणा युद्धपातळीवर रात्रंदिवस सज्ज राहणार आहे. वीजपुरवठ्याबाबत काही तक्रारी किंवा शंका असल्यास २४ तास सुरु असलेल्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा व संपाच्या कालावधीत सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

## नवी मुंबई विमानतळाचे उद्घाटन



# भ्रमनिरास

### पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांकडून दिबांच्या नावाचा फक्त उल्लेख

### नामकरणाच्या मुद्यावर मौन, प्रकल्पग्रस्तांमध्ये नाराजी

। पनवेल ग्रामीण । दीपक घरत ।

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी स्थानिक प्रकल्पग्रस्त आणि सर्व राजकीय पक्षांनी आंदोलन करीत सरकारला इशारा दिला होता. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देणार अशी घोषणा केली. अखेर विमानतळाच्या उद्घाटनाचा दिवस उजाडला. बुधवारी (दि.८) आपल्या लोकनेत्यांचे नाव विमानतळाला देणार यामुळे आंदोलकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहचला होता. उद्घाटन कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रम संपत आला. त्यावेळी शेवटच्या भाषणांपैकी मुख्यमंत्री आणि पंतप्रधान यांच्या भाषणात दि. बा.पाटील यांच्या नावाचा उल्लेख संघर्षयोद्धा म्हणून झाला. हे सर्व ठीक वाटले. परंतु दोन्ही नेत्यांनी विमानतळाच्या नामकरणाबाबत कोणतीच ठोस घोषणा केली नाही. यामुळे स्थानिकांचा भ्रमनिरास झाला. विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव दिल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी जाहीर करतील हे कानात साठवून ऐतिहासिक साक्षीदार बनण्यासाठी गेलेले स्थानिक,भूमीपुत्र निराश होवून परतले.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात लोकनेते दि.बा.पाटील यांना अभिवादन करत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबांचे नाव देण्याचा उल्लेख टाळल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये नाराजीचे वातावरण पसरल्याचे पाहायला मिळाले. तसेच राज्यातील नेत्यांनी देखील दिबांचे नाव देण्याबाबत कोणताही उल्लेख आपल्या भाषणात न केल्याने नेत्यांनी प्रकल्पग्रस्तांच्या तोंडाला एकप्रकारे पाने पुसत दगा दिल्याची भावना स्थानिकांनी व्यक्त केली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बुधवारी (दि.८) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे लोकार्पण करण्यात आले. लोकार्पण कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील यांच्या नावाची घोषणा करतील हे अपेक्षित होते. प्रत्यक्षात मात्र आपल्या भाषणादरम्यान पंतप्रधान मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी केवळ दिबांचे नाव घेत उपस्थित स्थानिकांचा भ्रमनिरासच केला. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार तसेच अन्य नेत्यांनी दिबांचे नाव घेणे टाळले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते दि.बां.पाटील यांचेच नाव देण्यात यावे, या मागणीसाठी भूमीपूत्र आक्रमक आहेत. याकरीता वेळोवेळी •>पान २ वर



> विमानतळाचे लोकार्पण झालं, याबद्दल आनंद आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिबांबद्दल गौरवोद्गार काढले. मुख्यमंत्री फडवणीस यांनीदेखील दिबांच्या नावाचा उल्लेख केला. मात्र विमानतळाला दिबांचेच नाव देण्यात येईल, असा उल्लेख न केल्याने वाईट वाटलं. पण विमानतळाला दिबांचेच नाव लागेल, याबद्दल खात्री आहे.
> – अतुल पाटील, लोकनेते दि.बा. पाटील यांचे पुत्र

> नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आता सुरू झाले आहे; पण आम्हा प्रकल्पग्रस्तांच्या मनातील आशा आणि अपेक्षा अद्याप जीवंत आहेत. या विमानतळाच्या नावात त्यागाचा आणि दि. बा. पाटील यांच्या कार्याचा सन्मान होईल का, हे येणारा काळच सांगेल. – रवि पाटील, स्थानिक नेते, वहाळ

> प्रकल्पग्रस्तांनी त्यांची गावे, राहती घरे, शेती, आयुष्य दिले. त्यामुळे विमानतळावर आमच्या त्यागाची ओळ राहावी, एवढीच इच्छा आहे. दि. बा. पाटील यांच्या नावाशिवाय या प्रकल्पाला पूर्णत्व नाही. – डॉ. प्रकाश टावरे, भिवंडी

### सुरक्षा यंत्रणेकडून चूक

- विमानतळाच्या उद्घाटनासाठी पंतप्रधान मोदी येणार असल्याने विमानतळ परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मात्र तरीदेखील विमानतळाची सुरक्षा भिंत ओलांडून दोन अनोळखी इसमांनी विमान क्षेत्रात प्रवेश केल्याचे वृत्त प्रसिद्ध झाल्याने सुरक्षा यंत्रणेचे वाभाडे यावेळी निघाल्याचे पाहायला मिळाले. वृत्त प्रसिद्ध झाल्यावर सतर्क झालेल्या यंत्रणेकडून सुरक्षा आणखी कडक करण्यात आली

> भूमिपुत्रांसाठी संघर्ष अटल आहे. मग तो उध्दव ठाकरे सरकारच्या काळातही करावा लागला आणि आताही करावा लागतोय. मोदीजी आणि फडणवीसांनी दोघांनी दिबांबद्दल गौरवास्पद शब्द काढल्यानंतर भूमिपुत्रांनी जल्लोष केला. मात्र दोघांनीही एकंदरीत इकडच्या स्थानिकांच्या भावनांना फाट्यावर मारत पाणी पुसण्याचे काम केले आहे. आता जे काही घडेल त्या सर्व परिस्थितीस सरकारने तयार रहावं. आमचा लढा आता तीव्र होणार आहे. नाव तर दिबांचंच लागणार मग नेपाळ होऊ दे किंवा श्रीलंका!
> – सर्वेश रविंद्र तरे (पंचमहाभूत संघटना)

### कोणकोणत्या एअरलाईन्स इच्छुक?

- एअर इंडिया, आकासा एअर आणि इंडिगो या तीन कंपन्यांनी त्यांच्या काही सेवा नवी मुंबई विमानतळावर हलविण्यासाठीचा करार केला आहे. मागच्या महिन्यात एअर इंडियाने इथून २० विमानांचे प्रस्थान (४० एअर ट्राफिक मुव्हमेंट) करण्याचे मान्य केले आहे. पहिल्या टप्प्यात भारतातील १५ शहरांत उड्डाण केले जाणार आहे. २०२६ च्या मध्यापर्यंत एअर इंडिया दिवसाला ५५ उड्डाण घेईल. ज्यात पाच आंतरराष्ट्री फ्लाईटचा समावेश असेल. सुरुवातीच्या एका महिन्यासाठी उड्डाणे सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत सुरु असतील. कोणती विमान कंपनी उड्डाणे घेईल, याविषयी स्पष्टता नसली तरी इंडिगो कंपनीचे विमान येथून पहिल्यांदा आकाशात झेपावेल असे बोलले जात आहे.

### विमानतळाचा पहिला टप्पा दृष्टिक्षेपात



- **19,650** कोटींचं ‘कमळ’ आकाराचं विमानतळ
- **3,700** मीटर लांबीचा धावपट्टीमार्ग
- **2** कोटी प्रवाशांची करणार हाताळणी
- **1,160** हेक्टर परिसरावर विमानतळाची उभारणी

## शिवसेना पक्ष, धनुष्यबाण कुणाचा?

### सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी पुन्हा टळली, आता १२ नोव्हेंबरला फैसला

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

महाराष्ट्राच्या राजकारणात कळीचा मुद्दा ठरलेल्या शिवसेना पक्षचिन्ह वादावरील पुढील सुनावणी १२ नोव्हेंबर रोजी होणार आहे. बुधवारी (दि.८)सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. हे प्रकरण न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर १६ नंबरला सुनावणीसाठी आले होते. यावेळी उद्धव ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी खंडपीठाकडे पुढील तारीख मागितली. सिब्बलांच्या मागणीनंतर सुप्रीम कोर्टाने अंतिम सुनावणीसाठी १२ नोव्हेंबर तारीख दिली.

शिवसेनेमध्ये फूट पडल्यानंतर निवडणूक आयोगाने शिवसेनेचे पक्षचिन्ह धनुष्यबाण आणि पक्षनाव शिवसेना हे एकनाथ शिंदे गटाला दिले होते. उद्धव ठाकरे गटाने निवडणूक आयोगाच्या निर्णयावर आक्षेप घेत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. निवडणूक आयोगाचा निर्णय बेकायदेशीर आणि असल्याचा दावा ठाकरे गटाने केला आहे. याआधी न्यायालयाने या प्रकरणावर काही प्राथमिक सुनावण्या घेतल्या असून, आता अंतिम टप्प्याकडे सुनावणी पोहोचत आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू होताच ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी युक्तीवाद करण्यास सुरुवात केली. सिब्बल यांनी तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली.

जानेवारी महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत, त्यामुळे या प्रकरणाची सुनावणी लवकरात लवकर घ्यावी, असे त्यांनी कोर्टात सांगितले.सिब्बल यांचा युक्तीवाद सुरू असताना दुसरे वकील वारंवार मध्यस्थी करत असल्याने त्यांना थांबवले. आधीच खूप वेळ गेला आहे, आता सुनावणी घ्या, असे त्यांनी न्यायालयासमोर आग्रहाने म्हटले. •>पान २ वर



### स्थानिक निवडणुकांपूर्वी मोठा राजकीय प्रभाव

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील काही दिवसांत पार पडणार आहेत. त्यामुळे खरी शिवसेना कोणाची हे स्पष्ट होणे निर्णायक ठरणार आहे. जर धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाकडेच कायम राहिले, तर त्यांना निवडणुकांत मोठा फायदा होईल. तर न्यायालयाने जर उद्धव ठाकरे यांच्या बाजूने निर्णय दिला, तर राज्याच्या राजकारणात नव्या घडामोडींना सुरुवात होऊ शकते.

## नोव्हेंबर अखेर निवडणुका होणार ?

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांच्या हालचाली प्रशासनाकडून सुरु झाल्या आहेत. जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होणार आहे. त्यामुळे नोव्हेंबर अखेरपर्यंत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. रायगड जिल्हा परिषदेवर यापूर्वी शेतकरी कामगार पक्ष २३, शिवसेना १८, राष्ट्रवादी ११, काँग्रेस व भाजप प्रत्येकी तीन असे बलाबल होते. रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्य पदांचा कार्यकाळ २२ मार्च •>पान २ वर

## शेकापक्ष प्रास्थापितांच्या विरोधात लढणारा पक्ष

### जिल्हा महिला अध्यक्षा शिवानी जंगम कडाडल्या




। खोपोली । प्रतिनिधी ।

शेकापक्ष नेहमीच प्रवाहविरोधात राहून तळागळातील शेतकऱ्यांसाठी प्रास्थापितांच्या विरोधात लढत आलेला पक्ष आहे. म्हणूनच आडलेला, नडलेल्या, गरजूंचा पक्ष म्हणून शेकापची ओळख असल्याचे शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख शिवानी जंगम यांनी रोजगार मेळाव्यात बोलताना सांगितले.

खोपोलीत रोजगार मेळाव्याचे आयोजन शेतकरी कामगार पक्षाचे राज्य खजिनदार अतुल म्हात्रे यांच्या संकल्पनेतुन करण्यात आले होते. याप्रसंगी जिल्हा महिला अध्यक्षा शिवानी जंगम बोलत होत्या.

एक उमेदवार •>पान २ वर

## महिला व पुरुषांना समान संधी

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग नगरपरिषदेच्या सदस्य पदांचे आरक्षण बुधवारी (दि.८)जाहीर करण्यात आले. चिठ्ठी सोडत पध्दतीने हे आरक्षण काढण्यात आले. दहा प्रभागात महिला व पुरुषांना समान संधी या निवडणुकीत मिळणार आहे. अलिबागचे उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षणाचा कार्यक्रम नगरपरिषदेच्या सभागृहात घेण्यात आला. यावेळी मुख्याधिकारी तथा प्रशासक उपस्थित होते.

२०१६ मध्ये झालेल्या अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणूकीत शेतकरी कामगार पक्षाची एक हाती सत्ता होती. २०२१ मध्ये कार्यकाल संपला. तेव्हापासून नगर परिषदेवर प्रशासकीय राजवट सुरु आहे. प्रशासनाद्वारे शहराचा कारभार चालविला जात आहे. सुरुवातीला मुख्याधिकारी म्हणून अंगाई साळुंखे होत्या. त्यांच्या बदलीनंतर मुरूडचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्याकडे अतिरिक्त कारभार सोपविण्यात आला. आता अलिबाग नगरपरिषदेवर पूर्ण वेळ प्रशासन अधिकारी म्हणून सागर साळुंखे गेल्या काही दिवसांपासून काम पहात आहेत. नगरपरिषदेची निवडणूक लांबणीवर गेल्याने गेली चार वर्षापासून अलिबाग नगरपरिषदेचा कारभार प्रशासकामार्फत चालत आहे. निवडणुका कधी होणार याकडे राजकीय कार्यकर्त्यांचे लक्ष लागून राहिले आहे. अखेर ही उत्कंठा संपण्याच्या वाटेवर आहे. नुकत्याच दोन दिवसांपूर्वी अलिबाग नगरपरिषदेच्या •>पान २ वर




> अलिबाग नगरपरिषदेची निवडणूक प्रदिर्घ कालावधीनंतर होणार आहे. प्रशासाकडून त्याची हालचाल सुरू झाली आहे. अलिबाग नगरपरिषदेच्या थेट अध्यक्षपदासाठी खुला महिला प्रवर्ग आरक्षण नुकतेच जाहीर झाले आहे. सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत योग्य पध्दतीने बुधवारी झाली. यामध्ये सर्व घटकांना प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळणार आहे.
> – ॲड. मानसी म्हात्रे, माजी उपनगराध्यक्षा तथा शेकाप राज्य महिला महिला आघाडी प्रमुख

बुलढाणा अर्बनचे अमृतमहोत्सवी वर्ष | आरडीसीसी बँक विशेष निमंत्रित

## सहकारातील सर्वोत्तम प्रवासाचा गौरव

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

सहकार क्षेत्राला नवचैतन्य देणारी देशातील अग्रगण्य पतसंस्था बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह मल्टीस्टेट क्रेडिट सोसायटी या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम देवकिसन चांडक उर्फ भाईजी यांच्या ७५व्या जन्मवर्षानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहेत, हे औचित्य साधून संस्थेचे जनरल मॅनेजर कैलास कासट, आयटी मॅनेजर शेट्टी यांनी अलिबाग येथे रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांची भेट घेऊन बँकेला निमंत्रित करताना संस्थेच्या चार दशकांच्या यशस्वी वाटचालीचा आणि सहकारातून घडवलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या उत्सवाची माहिती दिली.

१९८६ साली जनतेच्या पैशातून जनतेचे भले या तत्त्वावर उभारलेली बुलढाणा अर्बन आज भारतातील सर्वात मोठी सहकारी पतसंस्था म्हणून ओळखली जाते. संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक यांच्या दूरदृष्टीतून आणि विद्यमान अध्यक्ष डॉ. सुकश जमवार यांच्या नेतृत्वाखाली या संस्थेने आर्थिक, •>पान २ वर



### रायगड बँकेला सन्मानपूर्वक आमंत्रण

या अमृतमहोत्सवी सोहळ्यास रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेलाही विशेष निमंत्रित म्हणून सन्मानपूर्वक आमंत्रण देण्यात आले. बँकेचे अध्यक्ष जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहकार क्षेत्रातील सुशासन, शून्य निव्वळ एनपीए, सातत्यपूर्ण नफा, आणि तांत्रिक प्रगतीमुळे रायगड बँकेने स्वतः ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. सहकारातील सर्वोत्तम पद्धतींच्या आदानप्रदानासाठी आणि सहकार्याच्या भावनेतून बुलढाणा अर्बनने रायगड बँकेला सन्माननीय पाहुणा म्हणून निमंत्रित केले.तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांना महाराष्ट्र राज्य बँक असोसिएशनचा महाराष्ट्रातील बेस्ट सीईओ पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचेही अभिनंदन केले.

### आधुनिक बँकिंग आणि नवोन्मेष

संस्थेने कोअर बँकिंग, मोबाईल बँकिंग, ई-वॉलेट, इंटरनेट बँकिंग, व्हर्च्युअल कार्ड, आरटीजीएस-एनईएफटी, गोल्ड टेस्टिंग मशीन, व्हिडिओ सर्व्हेलन्स आणि ऑटोमेटेड वेअरहाऊस स्टॅकर्स यांसारख्या अत्याधुनिक सेवा सुरू केल्या आहेत. संस्थेचा अभिनव उपक्रम बुलढाणा अर्बन बिझनेस नेटवर्क (www.bubn.in) हे स्वदेशी ई-कॉमर्स व्यासपीठ आहे, जिथे लाखो सभासद एकमेकांशी व्यावसायिकरीत्या जोडले गेले आहेत. सोशल बँकिंग या अनोख्या संकल्पनेतून संस्थेने आर्थिक उपक्रमांसह आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, वृद्ध कल्याण आणि डिजिटल साक्षरता या सामाजिक क्षेत्रांमध्येही मोठे कार्य केले आहे. ९७९८ टक्के वसुली दरासह बुलढाणा अर्बनने पारदर्शक, जबाबदार आणि जनाभिमुख बँकिंगचा आदर्श निर्माण केला आहे.

## निडीची शाळा जमीनदोस्त करण्याचा डाव



भ्रष्ट अधिकाऱ्यांना शासनाचे मूक पाठबळ?

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

सरकारी जागेवर डल्ला, रायगडमध्ये पैसा बोलतो, शासन झोपले, भ्रष्टाचाराचा कहर अशा अनेक बातम्या रायगडमध्ये ऐकावयास मिळतात. परंतु आता सरकारी शाळा जमीनदोस्त करण्याचा डाव आखला जात असल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील निडी (साळाव) गावची जिल्हा परिषदेची शाळा काही समाजकंटकांनी बेकायदेशीररीत्या जमीनदोस्त करून पाडण्याचा प्रयत्न केला असल्याचे समोर आले आहे.

शाळेसारखी सार्वजनिक संपत्ती उद्ध्वस्त करून जमीन बळकावण्याच्या या प्रकाराने गावकऱ्यांमध्ये प्रचंड संताप आहे. ग्रामस्थांमध्ये चर्चा सुरू आहे की, या शाळेजवळील सरकारी जागा व कांदळवन तोडून एका मोठ्या कंपनीला गुप्तपणे ताब्यात देण्याचा कट रचला जातो आहे. या सर्व कारवायांच्या मागे अर्थपूर्ण व्यवहार, राजकीय पुढाऱ्यांचे आशीर्वाद व बड्या अधिकाऱ्यांचे •>पान २ वर

पान १ वरून

## भ्रमनिरास

आंदोलन देखील करण्यात आली आहेत. राज्य सरकारने देखील केंद्राकडे तसा प्रस्ताव पाठवला आहे. दिबांच्या नावाचा एकमेव प्रस्ताव असताना नामकरण करण्यासाठी विलंब का केला जात आहे, असा सवाल स्थानिकांनी उपस्थित केला आहे.

**कार्यक्रमावर भाजपची छाप**

उद्घाटनाच्या कार्यक्रमाप्रसंगी जागोजागी पंतप्रधान मोदींच्या स्वागताचे फलक लावण्यात आले होते. यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्यासोबतच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे देखील छायाचित्र छापण्यात आले होते. त्याच सोबत काही ठिकाणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे देखील फलक झळकत होते. मात्र या फलकांवर अजित पवार यांच्या पक्षाचा किंवा एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचा उल्लेख करण्यात आलेला नव्हता तसेच त्यांच्या पक्षाचे चिन्ह देखील छापण्यात आले नव्हते. मात्र त्या ठिकाणी भाजपचे निवडणूक चिन्ह असलेले कमळ छापलेले पाहायला मिळत असल्याने कार्यक्रमावर सर्वत्र भाजपची छाप असल्याची चर्चा सुरु होती.

केंद्रीय उड्डाण मंत्री राम मोहन नायडू, केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, वनमंत्री गणेश नाईक, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, जपानचे राजदूत, मावळचे खासदार श्रीरंग अप्पा बारणे, खासदार सुनील तटकरे, आमदार आशिष शेलार, आमदार मंदा म्हात्रे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह अनेक मंत्री आणि नेते उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ३ दिवस महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्याच्या पहिल्या दिवशी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे आणि मेट्रो एक्का लाईन-३ च्या अंतिम टप्प्याचे उद्घाटन झाले. नवी मुंबई विमानतळाचा पहिला टप्पा सुमारे १९६५० कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात आला आहे. हे विमानतळ पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यावर वर्षाला ९० दशलक्ष प्रवासी हाताळू शकणार आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील प्रवाशांसाठी हे दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ असेल. या विमानतळामुळे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी होणार आहे. उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दुपारी आगमन होणार होते. मात्र काहींशा उशिराने पंतप्रधान कार्यक्रमस्थळी पोहचले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रकल्पाची चर्चा दोन दशकांपासून सुरू होती. अखेर बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन झाल्यामुळे अखेर आता इथून विमानाचे उड्डाण होईल, यावर शिक्कामोर्तब झाले. पीपीपी मॉडेलवर आधारित विमानतळ प्रकल्पाचा विकास करण्यात आला असून पहिला टप्प्यासाठी १९,६५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

आज विमानतळाचे उद्घाटन झाल्यानंतर दोनपेक्षा अधिक विमानतळ असलेल्या लंडन, न्यूयॉर्क आणि टोक्योसारख्या जगविख्यात शहरांमध्ये आता मुंबईचाही समावेश झाला आहे. पहिल्या टप्प्यात नवी मुंबई विमानतळावर १ टर्मिनल, १ धावपट्टी व १० बस गेट आणि २९ एरो ब्रिजेस बांधण्यात आले आहेत. मात्र विमान उड्डाणासाठी काही काळ प्रतिक्षा करावी लागणार आहे.

**पहिले विमान कधी उड्डाण घेणार?**

अदाणी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेडचे सीईओ अरुण बन्सल यांनी सांगितले की, विमानतळाचे उद्घाटन झाल्यानंतर सुरक्षेचे उपाय तपासण्यासाठी विमानतळाचा ताबा केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाकडे देण्यात येईल. ३० ते ४५ दिवस त्यांचे काम चालेल. तसेच आम्हाला सीमाशुल्क आणि इमिग्रेशन पथकाचे काम पाहण्यासाठी जवळपास ४५ ते ६० दिवसांचा कालावधी लागेल.

विमानतळाचे कामकाज सुरळीत होण्याकरिता वरील कामे महत्त्वाची आहेत. त्याशिवाय पहिले उड्डाण घेण्यासाठी आणखी काही काळ लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे सीईओ कॅप्टन बीव्हीजेके शर्मा आणि बन्सल यांनी व्यक्त केलेल्या अंदाजानुसार पहिले व्यावसायिक उड्डाण घेण्याकरिता डिसेंबर २०२५ उजडू शकते.

## शिवसेना पक्ष, धनुष्यबाण कुणाचा?

या युक्तीवादासाठी सिब्बल यांनी कमीत कमी ४५ मिनिटांचा वेळ मागितला. यावर न्यायालयाने पुढील सुनावणीची तारीख निश्चित केली. आता या प्रकरणावर १२ आणि १३ नोव्हेंबर रोजी अंतिम युक्तीवाद होण्याची शक्यता आहे.

यासंदर्भात वकील असीम सरोदे यांनी देखील प्रतिक्रिया दिली. न्यायालयासमोर वेगवेगळ्या प्रकारची कामे आहेत. अपूर्ण सुनावणी पूर्ण करणे, हे वैध कारण आहे. ते कारण मुद्दामहून दिल्याचे आपण म्हणू शकत नाही. योग्य कारणासाठी वेळ नसल्याचे सांगत कोर्टाने तातडीने सुनावणी न घेता पुढील तारीख दिली. विरोधकांच्या वकिलांनी तीन दिवसांचा वेळ मागितला होता. तर ठाकरेंचे कपिल सिब्बल यांनी ४५ मिनिटे मागितली होती. तसेच स्थानिक निवडणुकांचा संदर्भ देत सुनावणी आज घेण्याबाबत आग्रह करण्यात आला, पण या निवडणुका जानेवारीमध्ये असल्यामुळे त्याआधी आपण ही सुनावणी घेऊ असे कोर्टाने सांगितले. त्यानंतर ते १९ नोव्हेंबर तारीख देणार होते, पण १२ नोव्हेंबर तारीख देण्यात आली.

१२ नोव्हेंबर रोजी युक्तीवाद सुरू करणार असल्याचे कोर्टाकडून सांगण्यात आले आहे. न्यायिक व्यवस्थापनामध्ये तारखा कोणत्या द्यायच्या हे आपण त्यांना सांगू शकत नाही. आज त्यांनी १२ नोव्हेंबरपासून सुनावणी असे सांगितले आहे. त्यामुळे १२, १३, १४ असे दोन तीन दिवसांत सुनावणी होईल असा त्याचा अर्थ आहे.

## शेकापक्ष प्रास्थापितांच्या विरोधात लढणारा पक्ष

आमदारकीची निवडणूक लढतो. अपयश आल्यावर तो अज्ञातवासात न जाता उत्तर रायगडभर रोजगार मेळाव्याचा कार्यक्रम राबवितो अशी स्तुती शेतकरी कामगार पक्षाचे राज्य खजिनदार अतुल म्हात्रे यांची शिवानी जंगम यांनी केली. त्या पुढे म्हणाल्या की, शिक्षण महाग झाल्यामुळे मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज काढले जाते. आईवडिलांना एक आशा आहे की शिक्षणानंतर चांगली नोकरी लागेल, परंतु नोकरी मिळत नसल्यामुळे मोबाइल खेळून फुकटचा डाटा वापरत आहेत. म्हणूनच इंजिनियर झालेला मुलगा पोटासाठी मिळेल ते काम करीत आहे. खालापूर तालुक्यात मोठमोठे कारखाने असतानाही ५० टक्के तरूण बेरोजगार आहेत. शेकापक्ष नुसता रोजगार मेळावा घेवून थांबणार नसून सातत्याने पाठपुरावा करून प्रत्येकाच्या हाताला काम मिळेल यासाठी लढणार आहे, असा विश्वास उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिवानी जंगम यांनी दिला. आजची महिला सर्व जबाबदाऱ्या खांद्यावर घेण्यासाठी ठाम उभी आहे, याची प्रचिती रोजगार मेळाव्यात मुलींची संख्या बघून आल्याचेही शिवानी जंगम यांनी बोलताना सांगितले.

## नोव्हेंबर अखेर निवडणुका होणार ?

२०२२ ला संपला. तेव्हापासून रायगड जिल्हा परिषदेवर प्रशासकीय राजवट सुरु आहे. प्रशासनाद्वारे जिल्ह्यातील ग्रामीण भागाचा कारभार चालविला जात आहे. सव्वा तीन वर्षे होऊनदेखील जिल्हा परिषदेच्या निवडणुका घेण्यात आल्या नाहीत.अध्यक्षपदासाठी सर्वसाधारण आरक्षण पडले आहे. प्रदिर्घ कालावधीनंतर रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहे. त्यानुसार प्रशासनाच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली असल्याचे चित्र दिसून आले आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे. प्रारुप मतदार यादींवर हरकती व सुचना स्विकारणे. निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय मतदार याद्या अंतिम व अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे. मतदान केंद्राची व मतदान केंद्र निहाय यादी प्रसिध्द करणे ही प्रक्रिया राबविली जाणार आहे. बुधवार (दि.८)पासून त्याची सुरुवात झाली असून सोमवारी (दि.२७) ऑक्टोबरपर्यंत ही प्रक्रिया असणार आहे. त्यामुळे या निवडणुका नोव्हेंबर अखेरपर्यंत लागण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

**संकेतस्थळावर मतदार यादी**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकासाठी निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी https://raigad.gov.in, या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे, याबाबत नागरिकांनी नोंद घ्यावी, असे उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) डॉ.रविंद्र शेळके यांनी सांगितले आहे.

## महिला व पुरुषांना समान संधी

अध्यक्षपदाचे आरक्षण जाहिर झाले. खुला महिला प्रवर्गाचे आरक्षण ठेवण्यात आले आहे.

नगरपरिषदेच्या सदस्यपदांचे आरक्षण बुधवारी (दि.८) उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर करण्यात आले. शहरातील दहा प्रभागामध्ये अ व ब प्रमाणे प्रत्येकी दोन उमेदवार असणार आहे. त्यामुळे प्रभाग एकमध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग (सर्वसाधारण), सर्वसाधारण (महिला), प्रभाग दोनमध्ये अनुसूचित जमाती (महिला), सर्वसाधारण, प्रभाग तीनमध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), सर्वसाधारण, प्रभाग चारमध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग(महिला), सर्वसाधारण. प्रभाग पाचमध्ये अनुसूचित जाती (महिला), सर्वसाधारण. प्रभाग सहामध्ये नागरिकांचा मागासप्रवर्ग(सर्वसाधारण), सर्वसाधारण (महिला), प्रभाग सातमध्ये सर्वसाधारण (महिला), सर्वसाधारण, प्रभाग आठमध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), सर्वसाधारण, प्रभाग नऊमध्ये अनुसूचित जमाती (महिला), सर्वसाधारण, प्रभाग दहामध्ये अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) व सर्वसाधारण (महिला) असे आरक्षण पडले आहे. नागरिकांचा मागासप्रवर्गातील तीन महिला, सर्वसाधारण महिला चार, अनुसूचित जाती महिला एक, अनुसूचित जमाती महिला दोन असे आरक्षण जाहिर झाले आहे. या आरक्षणामध्ये महिला व पुरुषांना समान संधी देण्यात आली आहे.

## निडीची शाळा जमीनदोस्त करण्याचा डाव

मूक सहकार्य असल्याचा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

ग्रामस्थांनी सरळ प्रश्न केला आहे की, हे विदारक चित्र पाहून शासन मूग गिळून गप्प बसण्याचे कारण काय आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे मुख्य सचिव, शिक्षण सचिव, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे व जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकारी नेहा भोसले यांच्याकडे ग्रामस्थांनी स्पष्ट मागणी केली आहे की, दोषींना त्वरित अटक करून सरकारी जागा सुरक्षित करावी. अन्यथा, 'जनतेची शाळा वाचवा, सरकारी जागा वाचवा' या हाकेसह तीव्र आंदोलन उभे करण्याशिवाय ग्रामस्थांना पर्याय उरणार नाही. रायगडमध्ये भ्रष्टाचार इतक्या टोकाला गेला आहे की पैसा असेल तर अनधिकृत कामे अधिकृत केली जातात, सरकारी कागदपत्रांची फेरफार करून जुन्याची नवी व नव्याची जुनी केली जाते. शासनाच्या या बेपर्वाईमुळे लोकांच्या डोळ्यांसमोर सरकारी संपत्ती लुटली जात आहे.

## सहकारातील सर्वोत्तम प्रवासाचा गौरव

तांत्रिक आणि सामाजिक क्षेत्रात क्रांतिकारक प्रगती साधली आहे आणि विशेष म्हणजे संस्थात्मक उभारणी आणि संस्था हीच आपली ओळख हे आपल्या कामगिरीने देशाला पटवून देण्यात त्यांनी मोलाची कामगिरी केली आहे.

**बुलढाणा अर्बनची कार्ययात्रा**

गेल्या चार दशकांत बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह मल्टीस्टेट क्रेडिट सोसायटी लिमिटेडने सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी जनतेच्या आर्थिक गरजा पूर्ण करताना आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक जबाबदारीचा सुंदर संगम साधला आहे. आज संस्थेकडे १७ लाख सभासद, ४७६ शाखा, ७,००० पेक्षा अधिक कर्मचारी असून तब्बल २५,००० कोटींपेक्षा अधिक व्यवसाय संस्थेने मार्च २०२५ अखेर पूर्ण केला आहे. ज्यामध्ये १५,००० कोटींपेक्षा अधिकच्या ठेवी तर सोनेतारण कर्ज पोर्टफोलिओ ४००० कोटी रुपयांहून अधिक, वेअरहाऊस लोन १,६०० कोटी रुपये, तसेच इतर कर्ज योजनासह कर्जाचा विस्तार १०,००० कोटी रुपयांपर्यंत विस्तारला आहे. संस्थेचे महाराष्ट्रसह मध्यप्रदेश,कर्नाटक आणि तेलंगणामध्ये देखील जाळे पसरले आहे. औद्योगिक शेती प्रकल्प आणि लघुउद्योजकांना भांडवल सहाय्य देऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी संस्थेने तब्बल ४३१ गोडावून उभारले आहेत. .

जलसंधारण क्षेत्रात बुलढाणा अर्बनने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. येलगाव धरणाचे खोदकाम करून ५० लाख घनमीटर (५ कोटी लिटर) क्षमतेची वाढ करण्यात आली. २५ मोठे एक्स्काव्हेटर्स आणि १,००० ट्रॅक्टर्सच्या सहाय्याने हे कार्य पूर्ण करण्यात आले. तसेच ३०० हून अधिक फार्म पाँड्स, गॅबियन बंधारे, फार्म लेव्हलिंग आणि चेकडॅम्स उभारून १,९०० दशलक्ष चौरस मीटर जमिनीखाली पाणीसाठा निर्माण करण्यात आला आहे.शिक्षण आणि संस्कार क्षेत्रातही संस्था पुढे आहे. वेद विद्यालय स्थापन करून वैदिक शिक्षणाचा प्रसार सुरू केला आहे. बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड च्या शैक्षणिक उपक्रमांतर्गत, सहकार विद्या मंदिर या इंग्रजी माध्यमाच्या शाळांद्वारे ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. संस्थेने उभारलेल्या २२ शाळांमध्ये एकूण २५,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ, योग, संगणक शिक्षण, संस्कृत श्लोक पठण, नृत्य, संगीत, कराटे, इनडोअर गेम्स, तलवारबाजी, घोडेस्वारी आणि सैनिक प्रशिक्षण यांसारख्या विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. सहकार विद्या मंदिर हे विदर्भातील जिल्हास्तरीय पहिले बोर्डिंग स्कूल असून, ४ कोटी रुपयांच्या निधीने स्थापन केले गेले आहे आणि १६ शाखा सुरू करण्यात आले आहेत. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शाळा बॅग, टिफिन, होमवर्क, ट्युशन क्लासेस आणि शिक्षण शुल्क यापासून मुक्त ठेवले जाते, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारते.आज बुलढाणा येथील एकाच शाळेत तब्बल ५००० पेक्षा विद्यार्थी असून २००० विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था देखील करण्यात आलेली आहे. संस्थेच्या वतीने ५ ठिकाणी ज्युनिअर कॉलेजसुद्धा उभारलेले आहेत ज्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना त्याचा थेट लाभ होत आहे.

तसेच संस्थेच्या वतीने श्रद्धास्थानांवर ५ भव्य भक्ती निवास शिर्डी, तिरुपती, ओंकारेश्वर, माहूर आणि नागपूर येथे उभारण्यात आले असून, ७०० हून अधिक यात्रेकरूंना एकावेळी निवासाची सुविधा आहे. आतापर्यंत २ लाख सभासदांनी या सेवांचा लाभ घेतला आहे. राज्यातील अनेक पतसंस्था सुद्धा इथे विश्वासाने ठेवी ठेवत आहेत हे सुद्धा एक विशेषच आहे शिवाय अनेक पतसंस्थाना अडचणीच्यावेळी सहकारातून हात देण्याचे आणि सहकार्य करण्याची भावना बुलढाणा अर्बन संस्थेला इतरांपेक्षा वेगळी ओळख देत आहे.

**प्रेरणादायी प्रवास सहकारातून सहकाराचा विस्तार**

बुलढाणा अर्बनचा हा प्रवास केवळ आर्थिक विस्ताराचा नसून सहकार, सामाजिक जबाबदारी आणि नवोन्मेष यांचा संगम आहे. संस्थापक राधेश्याम चांडक यांच्या दूरदृष्टीतून रुजलेली ही परंपरा आज संपूर्ण देशातील सहकारी संस्थांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. या प्रवासात बुलढाणा अर्बनने केवळ स्वतःचा विकास केला नाही, तर सहकारी क्षेत्रातील इतर संस्थांसोबत अनुभवांची देवाणघेवाण करून संपूर्ण सहकाराच्या प्रगतीस हातभार लावला आहे. यामध्ये रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसारख्या अग्रगण्य संस्थांना विशेष आमंत्रण देऊन त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचा आदर केला आणि सहकारातून सहकार वाढवण्याचे उदाहरण घडवले. संस्थेच्या या दृष्टिकोनामुळे केवळ आर्थिक व्यवहारच नव्हे तर शिक्षण, जलसंधारण, महिला सक्षमीकरण, आरोग्य आणि सामाजिक कल्याण यांसारख्या क्षेत्रांमध्येही सहकारी भावना जोपासली गेली आहे. बुलढाणा अर्बनचा हा प्रवास आज देशभरातील सहकारी संस्थांसाठी आदर्श आणि प्रेरणेचा दीपस्तंभ ठरत आहे.

# वाढवण, जेएनपीए देशाचा आर्थिक कणा

## ■ चेअरमन उन्मेष वाघ यांचा विश्वास

**| उरण | प्रतिनिधी |**

जेएनपीए बंदर हे आज देशाच्या आर्थिक प्रगतीचे हृदय आहे आणि वाढवण बंदर त्या हृदयाचा दुसरा ठोका ठरणार आहे, असे प्रतिपादन जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष शरद वाघ यांनी केले. जेएनपीए कामगार एकता संघटनेच्या वार्षिक कामगार मेळाव्यात ते बोलत होते. या मेळाव्याचे आयोजन कामगार एकता संघटनेचे विश्वस्त दिनेश पाटील यांनी केले होते. या कार्यक्रमात हास्यप्रबोधनकार संजीवन म्हात्रे यांनी उन्मेष वाघ यांची खास मुलाखत घेतली.

वाघ म्हणाले की, जेएनपीए बंदराची गेल्या काही वर्षांतील प्रगती पाहता हे बंदर देशाचा आर्थिक कणा बनले आहे. वाढवण बंदरही त्याच धर्तीवर विकसित होत असून ही दोन्ही बंदरे देशाच्या विकासाच्या गतीला नवी दिशा देणार आहेत. वाढवण बंदराला सुरुवातीला विरोध करणारे स्थानिक आता त्याच प्रकल्पाचे स्वागत करत आहेत. आम्ही त्यांच्या मनातील शंका दूर केल्या, विकासाची प्रत्यक्ष उदाहरणे दाखवली आणि स्थानिकांचा विश्वास संपादन केला. हनुमान कोळीवाडा प्रश्न वगळता उर्वरित सर्व प्रलंबित प्रश्न सोडवण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. स्थानिक भूमिपुत्रांचा त्याग आम्हाला नेहमीच प्रेरणा देतो.

वाघ पुढे म्हणाले की, वाढवण भागातील सुमारे पंधरा हजार नागरिकांना आम्ही जेएनपीए बंदर परिसरात आणून बंदर विकासाचे प्रत्यक्ष दर्शन घडवले. या भेटीमुळे वाढवण प्रकल्पाला आता स्थानिकांचे मोठ्या प्रमाणात समर्थन लाभत आहे. जगातील उत्कृष्ट बंदरांमध्ये जेएनपीएचा समावेश झाला आहे. जागतिक बँकेकडून उत्कृष्टतेचे प्रमाणपत्र मिळाल्यामुळे जेएनपीएचा क्रमांक जगात ९७ वरून थेट २३ वर पोहोचला आहे. मुंबई बंदरानंतर जेएनपीए आणि आता वाढवण बंदर या विकास साखळीतील महत्त्वाचे टप्पे आहेत. या माध्यमातून देशाच्या आर्थिक भविष्यास आकार देण्याचे कार्य सुरू आहे. वाढवण बंदर हे जेएनपीएच्या तीनपट मोठे असून या प्रकल्पासाठी तब्बल ७६,२२० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. सात ते आठ किलोमीटर समुद्रातच हे बंदर उभारण्यात येणार असून एकाही गावाचे विस्थापन होणार नाही. कोणतेही घर उद्ध्वस्त न करता विकासाची वाट मोकळी करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे सुमारे बारा लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील, असे वाघ म्हणाले.


### जाहिर नोटीस

सर्वाना कळविणेत येते की, मिळकतीचे वर्णन : तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी तहसिल अलिबाग, यांचे हद्दीमधील तसेच अधिकार क्षेत्रातील, जि.प.रायगड,पं.स. अलिबाग यांचे कार्यकक्षेतील, गाव कोळगांव या महसुली गावचे ७/१२ पत्रकी नोंद असलेले मिळकतीचे वर्णन: गट क्र. ३६७/१ याचे क्षेत्र हे. ०.४४.३० आर.चौ.मी. आणि पोट खराब हे.०.०२.८० आर.चौ.मी. असे एकूण क्षेत्र हे. ०.४७.१० आर.चौ.मी. शेत मिळकत पैकी लिहून देणार जागा मालक यांचे मालकीहक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील हे.०.३२.००.आर.चौ.मी ही मिळकत शर्मिला चंद्रकात ठाकूर, राजश्री सुभाष म्हात्रे, वैजयंती चंद्रकात म्हात्रे, साधना अजित काटकर, प्राप्ती निलेश गावंड सर्व रा. मु. पो.कोळगांव,ता.अलिबाग, जि. रायगड यांचे मालकी हक्काची व कब्जेवहिवाटीची असून सदर मिळकत आमचे अशिल श्री सचिन बाबूराव बडवे यांना खरेदी देणेचे मान्य व कबुल केलेले आहे.

सबब, सदर मिळकतीवर कोणचाही हक्क, अधिकार, कोर्ट कचेरी, बँक अथवा वित्तीय संस्थेचा कर्ज, बोजा, कुळ हक्क, तारण गहाण, लागलिगाड, खरेदी अगर इतर कोणताही हक्क संबंध असलेस सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर येवून योग्य त्या कागदोपत्रासह खात्री करून द्यावी. मुदतीत तसे न झालेस सदर मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल तदनंतर कोणतीही व कसलीही तक्रार आमचे अशिलांचे खरेदी व्यवहारावर बंधनकारक राहणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस आज मु. कोल्हापूर.

दिनांक :- ०९/१०/२०२५

**चैतन्य सुनिल खंदारे**
ॲडव्होकेट
ऑफीस - १३१७ दलामल टॉवर,
फ्री, प्रेस मार्ग, नरिमन पॉईट, मुंबई

### हरकत नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्रीमती देवयानी जयवंत सावंत, रा. मुशेत, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी खालील नमूद मिळकती संदर्भात सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांसोबत खरेदी विक्री करण्यासाठीचा साठेकरार केलेला असून सदर मिळकती संदर्भात मोबदला रक्कम देखील सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांस साक्षीदारांसमक्ष अदा केलेली आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| रामराज, ता. अलिबाग | ८/१ | क्षेत्र ०.७४.०४ | १०.३७ |
| रामराज, ता. अलिबाग | ८/३ | क्षेत्र १.४७.०६ | २०.७६ |

सदर वर वर्णनांकीत मिळकती संदर्भात आमचे अशिल श्रीमती देवयानी जयवंत सावंत व त्यांचे दिवंगत पती जयवंत रामचंद्र सावंत यांनी सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांसोबत सदर मिळकत खरेदी करण्याबाबत साठेकरार केलेला आहे. गट नं. ८/१ च्या संदर्भात दिनांक २०/११/२०११ रोजी तसेच गट नं. ८/३ च्या संदर्भात दिनांक ३०/०६/२०११ रोजी साठेकरार स्वाक्षरीत केलेला आहे. तसेच या साठेकरारापोटी मोबदला रक्कम देखील आमचे अशिलांनी वर नमूद मिळकतींच्या मालकांना अदा केलेली आहे. तसेच तेव्हापासून सदर मिळकती आमचे अशिलांचे बिनशर्त ताबेकब्जामध्ये आलेल्या आहेत. परिणामी सदर मिळकती आमचे अशिलांच्या विना तक्रार, विना खंड ताब्यामध्ये आहे. तसेच वर नमूद मिळकतींची साठेकरारापोटीची मोबदला रक्कम आमचे अशिलांनी सदर मिळकतींच्या विद्यमान मालक व सातबारा सदरी असलेल्या सह हिस्सेदारांना साक्षीदारांसमक्ष सदर व्यवहाराची संपूर्णपणे अदा केलेली आहे. असे असताना आमच्या अशिलांशी असलेला वर नमूद मिळकतीच्या संदर्भातला करारनामा डावलून अथवा भंग करून सदर मिळकत परस्पर त्रयस्थ इसमांना विक्री करणार असल्याचे व त्याबाबतचा विक्रीचा करारनामा आमच्या अशिलांच्या अपरोक्ष करण्याचा प्रयत्न सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून करण्यात येत असल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे. सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. अन्यथा आमचे अशिल सदर प्रकरणी दिवाणी फौजदारी कारवाई करतील. या उपरही सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचे खरेदीखत, बक्षिसपत्र, साठेकरार, वचन चिठ्ठी, सामंजस्य करार केल्यास त्यास आमचे अशिलांची सक्त कायदेशीर हरकत असून असा कोणताही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग सही/-
दिनांक : ०९/१०/२०२५

**ॲड. विक्रांत वि. पाटील**
म्हात्रोळी, अलिबाग-रायगड
मो.नं. ८३२९४६१५४०/९४०३६५१४३६

### Public Notice

That my client Shri. Amol Balkrishna Mhatre, Residing at Chaul has initiated primary talks with Shabbir Salebhai Mahimwala and Tasnim Shabbir Mahimwala regarding purchase of following property situated at Village Akshi, Taluka Alibag. District Raigad.

| Sr.No. | Block No | Area Ht. Ar.. Pt. | Assessment Rs. Ps. |
|---|---|---|---|
| 1. | 234 | 0-17-40 | 4=87 |
| 2. | 235/4 | 0-56-9 | 00 |

0-12-0 Ares Bagayat land out of it

That block number 234 and one unnumbered house in dilapidated condition built over it is owned by Shabbir Salebhai Mahimwala and an area admeasuring 0-12-0 Ares of Bagayat land out of Block Number 235/4 is owned by Shabbir and Tasnim Mahimwala.

That above present respective owners of the property have assured my client about their marketable and clear title to the above said property and has further assured that they have not created third party interest of any kind in respect of it.

Hence by this notice it is called for that if anybody has any kind of right or interest of any kind in respect of the abovesaid property, the concerned person is called for to convey the undersigned in writing regarding their interest along with documentary proof within 10 days from date of this public notice. That if no such communication or any kind of objection is received within this stipulated time, my client would be proceeding further with the deal and any kind of objection received after this stipulated period would not be considered.

Dated: 08/10/2025

Adv. Sanjay Acharya.
At and Post Chaul
Tal. Alibag. Dist. Raigad

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतींचे विद्यमान मालक यांचेकडुन कायमची विकत घेण्याची निश्चित केलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकत परिशिष्ठ- मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| खातेदार नाव | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर.प्रति | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| नैना श्रीफळ बाफना, भूपेंद्र बस्तीमल राठोड | १७४/३ | ३.९५.०० | २.२६ |
| विमल मारूती पाटील व इतर ३ | | १.२५.०० | ०.०० |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथम दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

टिप. सदरची नोटीस खरेदीदारांचे संमतीपत्रकावरून प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

कार्यालय पत्ता सही /
१०३, पहिला मजला, पांडुरंग धाम, **ॲड.कैलास अनंत बासरे**
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड.मो.नं.७७९८४३३८८८

### जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र. ५२१/२०२५

१. सिराज हसन डावरे, अर्जदार
रा. दहिवली तर्फे गोवेले, ता. माणगाव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
दहिवली तर्फे गोवेले, ग्रामपंचायत दहिवली तर्फे गोवेले, सामनेवाले
ता. माणगाव, जि. रायगड
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री. सिराज हसन डावरे, रा. दहिवली तर्फे गोवेले, ता. माणगाव यांचा जन्म मौजे दहिवली तर्फे गोवेले, ता.माणगाव, जि.रायगड याठिकाणी दि. १९/०६/१९७६ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.३१/०७/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे जन्म दहिवली तर्फे गोवेले, ता. माणगाव येथे दि. १९/०६/१९७६ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे. व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे जन्म दि. १७/०६/१९७६ रोजी दहिवली तर्फे गोवेले, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : ०८/१०/२०२५

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि. रायगड**

### जाहीर नोटीस

अर्ज क्र. २१८/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्रीम. सुलोचना बाळाराम टेंबे
वय ६३ वर्षे, धंदा : गृहिणी, अर्जदार
रा. सध्याचा पत्ता :- केसरकर चाळ,
विमसिम बेकरी जवळ, लोकमान्य नगर,
पाडा नं. ४, ठाणे
कायमचा पत्ता :- खर्डी बु.,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत दाखणे,
ता. माणगांव, जि. रायगड सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्रीम. सुलोचना बाळाराम टेंबे यांचे पती कै. बाळाराम सिताराम टेंबे हे दि. ०८/०८/२०१६ रोजी मौजे खर्डी बु., ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले आहेत. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. २४/०२/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे पती कै. बाळाराम सिताराम टेंबे हे दि. ०८/०८/२०१६ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. सुलोचना बाळाराम टेंबे यांचे पती कै. बाळाराम सिताराम टेंबे हे दि. ०८/०८/२०१६ रोजी मौजे खर्डी बु., ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले आहेत. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव : सही/-
ता.: २९/०९/२०२५ कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

दिनांक : ०९/१०/२०२५

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. दामोदर गणपत रिकामे, २.प्रतिभा प्रकाश खेडेकर, ३.रंजना सुरेश बाजे, ४.संगीता दिनेश सारंगे, ५.अर्चना अशोक काते यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

**मौजे-वावे, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वावे ता.मुरुड | ११९ | क्षेत्र ०-७८-३० पो.ख. ०-०६-७० एकूण क्षेत्र ०-८५-०० | १३.४६ |
| वर नमुद मिळकतीपैकी क्षेत्र ०-१५-०० हे. आर. ही मिळकत. | | | |

दिनांक :- ०९/१०/२०२५

अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट, जे.एस.एम कॉलेज जवळ
अलिबाग - रायगड, मोबा. ९७६७०१०९०२

# ग्रामीण रूग्णालयात रूग्णांची गैरसोय

। नेरळ । प्रतिनिधी ।

**कर्जत तालुक्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागातील आरोग्य सेवेसाठी महत्वाचे असलेले कशेळे येथील ग्रामीण रुग्णालय योगदान देत आले आहे. मात्र, तेच ग्रामीण रुग्णालय हे अनेक समस्यांनी व्यापले आहे. काही महिन्यांपासून येथील नेत्र विभागात डॉक्टरच नसल्याचे समोर येत आहे. त्यामुळे नेत्र दोष असलेल्या रुग्णांना कोणतीही सुविधा मिळत नाही. तसेच, स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडून देखील ग्रामीण रूग्णालयाकडे दुर्लक्ष होत असल्याने रुग्णांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.**



■ नेत्र विभागात डॉक्टरच नाहीत

■ स्थानिक आमदारांचे दुर्लक्ष

कशेळे ग्रामीण रुग्णालयात बहुतांशी आदिवासी आणि दुर्गम खेड्यातील रुग्ण येत असतात. आदिवासी भाग असलेल्या कशेळे ते खांडस, कशेळे ते आंबिवली, मेचकरवाडी, तसेच पिंपळोळी, गुढवण, सुगवे, लोभेवाडी, ताडवाडी, वारे, लाखाचीवाडी, जांबुळवाडी अशा अनेक गावांमधून पंधरा ते वीस किलोमीटरचा प्रवास करून या ग्रामीण रूग्णालयात यावे लागते. त्यातच ग्रामीण रूग्णालयातील नेत्र विभागात डॉक्टर नसल्याने रुग्णांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. डॉक्टर नसल्याने नागरिकांना भेडसावणाऱ्या डोळ्यांचा प्रश्न गंभीर होत आहे. ३१ मार्च रोजी नेत्र विभागातील डॉक्टर निवृत्त झाल्यामुळे गेले सात महिने हे पद रिक्त आहे. त्यामुळे एकप्रकारे नेत्र विभाग सेवा बंद आहेत. नेत्र तपासणी, चष्मे वाटप करणे अशा अनेक प्रकारची नागरिकांची होणारी सोय बंद झाली आहे. त्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्वरित लक्ष देऊन नेत्र विभागात डॉक्टर उपलब्ध करून द्यावे. तसेच, नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनी लक्ष घालावे, अशी मागणी आदिवासी भागातून होत आहे.

> **“कशेळे येथील ग्रामीण रुग्णालयात सर्वसामान्य व आदिवासी बांधव मोठ्या प्रमाणात उपचार घेत असतात. येथे प्राथमिक उपचार करण्यासाठी दंत विभागासाठी डॉक्टर उपलब्ध आहेत. परंतु, सात महिने झाले तरी डोळे तपासण्यासाठी व डोळ्यावरील उपचारासाठी डॉक्टर उपलब्ध नाहीत. आम्ही आमच्या डोळ्यांच्या समस्या या रूग्णालयात घेऊन येत असतो. परंतु, येथे डोळ्यांचे डॉक्टर उपलब्ध नसल्याने आम्हाला परत जावे लागते. त्यामुळे येथे डॉक्टर उपलब्ध करून द्यावे, हीच आमची सरकारकडे मागणी आहे.**
> **–अनंत भोर्डे, स्थानिक ग्रामस्थ”**

# उरण तालुका संघटकपदी अरुण तेलंग यांची निवड

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते तथा कामगार नेते अरुण तेलंगे यांची शेकापपक्षाच्या कामगार संघटनेच्या उरण तालुका संघटकपदी निवड करण्यात आली आहे. शेकापचे तालुका चिटणीस तथा कामगार नेते रवी घरत व उरण पंचायत समितीचे माजी सभापती नरेश घरत यांनी अरुण तेलंगे यांचे अभिनंदन केले आहे.



अरुण तेलंगे गोर गरीबांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करत असून एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून त्यांची जनमानसात ओळख आहे. एमआयडीसी या महामंडळात त्यांनी ४० वर्षे नोकरी केली आहे. तसेच, एमआयडीसीमधील एम्प्लाइज युनियनमध्ये महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख पदाची महत्वाची जबाबदारी सांभाळली आहे. एक उत्कृष्ट कामगार नेता ते सामाजिक कार्यकर्ता अशी जनमानसात ओळख असणाऱ्या अरुण तेलंगे यांना विविध संस्थांकडून सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी बोलताना तेलंगे म्हणाले की, शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, मा. आमदार बाळाराम पाटील, तालुका चिटणीस रवी घरत तसेच इतर पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कामगारांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

## निवडक



### रोहा-कोलाड मार्गावर गुरांचा सुळसुळाट

**खांब** : रोहा–कोलाड अंतर्गत राज्य मार्गावर मोकाट गुरांचा मोठ्या प्रमाणावर रस्त्याच्या मधोमध ठिय्या असतो. तसेच, ही मोकाट गुरे रस्त्यावर सैरभैर फिरत असल्याने प्रवासी वर्ग व वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. या प्रकारामुळे स्थानिक ग्रामस्थ व वाहन चालकांसह प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे उनाड गुरे इतरत्र फिरत असताना गुरांचे मालक निवांतपणे घरीच झोपा काढत असल्याचे संतप्त ग्रामस्थांकडून बोलले जात आहे. तसेच, या मोकाट गुरांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याने मोठ्या प्रमाणावर वाहतूककोंडीही निर्माण होताना दिसत आहे. तर, वाहन चालकांच्या घाईगडबीत मोठाले अपघात झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्यातच जर दुर्दैवाने एखाद्या गुराचा अपघात झालाच तर मालकवर्ग भरपाई मिळावी म्हणून धावत पळत येतो; परंतु, आपल्या गुरांमुळें एखाद्याला अपघातामध्ये दुखापत झाली तर गुरांचा मालक जवळ सुद्धा फिरकत नसल्याने अनेकदा समोर आले आहे. अशा मोकाट गुरांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी संबंधित प्रशासनाच्या माध्यमातून कडक पावले उचलून योग्य ती कारवाई करण्याची मागणी प्रवासी वर्ग व वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

### महिला आरक्षणामुळे इच्छुकांचा हिरमोड

**खोपोली** : खोपोली नगर परिषदेचे आरक्षण सोडत जाहीर झाले आहे. त्यात ३१ पैकी सोळा जागा महिलासांठी तर फक्त पंधराच जागा पुरूषांसाठी आरक्षित करण्यात आल्याने इच्छुकांच्या दांड्या उडल्या आहेत. अनेक इच्छुक उमेदवारांनी पक्षविरहीत अंतर्गत पॅनल करून निवडणूक लढण्याची सेटींग केली होती. महिला ओबीसी आणि एक सर्वसाधारण आरक्षण पडल्यामुळे नेत्यांची चांगलीच पंचायत झाला असून आता निवडणूकीत आमने–सामने लढावे लागणार आहे. यावेळी प्रभाग क्रमांक १ ‘अ’ ना.मा.प्र. महिला व ‘ब’ सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक २ ‘अ’ अनुसूचित जाती व ‘ब’ सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक ३ ‘अ’ अनुसूचित जाती महिला व ‘ब’ सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ४ ‘अ’ ना.मा.प्र. व ‘ब’ सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक ५ अनुसूचित जाती महिला व ‘ब’ सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ६ ‘अ’ सर्वसाधारण महिला व ‘ब’ सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ७ ‘अ’ ना.मा.प्र. महिला व ‘ब’ सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ८ ‘अ’ ना.मा.प्र. व ‘ब’ सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक ९ ‘अ’ अनुसूचित जमाती व ‘ब’ सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक १० ‘अ’ ना.मा.प्र. महिला व ‘ब’ सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ११ ‘अ’ सर्वसाधारण महिला व ‘ब’ सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक १२ ‘अ’ ना.मा.प्र. महिला व ‘ब’ सर्वसाधार, प्रभाग क्रमांक १३ ‘अ’ ना.मा.प्र. व ‘ब’ सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक १४ ‘अ’ ना.मा.प्र. व ‘ब’ सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक १५ ‘अ’ सर्वसाधारण महिला व ‘ब’ सर्वसाधारण असे आरक्षण पडले आहे.



### मोबाईल तक्रारदारांच्या स्वाधीन

**म्हसळा** : म्हसळा पोलीस ठाणे हद्दीतील विविध ठिकाणी हरवलेले मोबाईल फोन शोधून काढण्यामध्ये स्थानिक पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. सीइआयआर पोर्टलवर ट्रेसिंगसाठी नोंदवलेले मोबाईल ट्रेस करून सुमारे १.२० लक्ष रुपये किमतीचे ६ स्मार्टफोन हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. हे मोबाईल फोन संबंधित तक्रारदारांना उप विभागीय प्र. पोलीस अधिकारी सूर्यवंशी यांच्या हस्ते थेट त्यांच्या स्वाधीन करण्यात आले असल्याचे म्हसळा तालुका पोलीस निरीक्षक संदिप कहाले यांनी माहिती देताना सांगितले. मोबाईल प्राप्त करणाऱ्या तक्रारदारांमध्ये प्रामुख्याने संतोष शशिकांत पानसरे, स्वप्नील रविंद्र लाड, योगेश मोहन भागवत,सुदेश अशोक देवडे,जमीर तुरूक आणि अजिज नजीर यांचा समावेश आहे. ही कामगिरी रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत पोलीस निरीक्षक संदीप कहाळे, उप पोलीस निरीक्षक रोहिणकर,पोलीस कॉन्स्टेबल गजानन कांबळे,पोलीस हेड कॉन्स्टेबल बोगाणे आणि पो.कॉ.पगार यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे.

# नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई

। पनवेल । प्रतिनिधी ।

वाहनचालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, यासाठी रॅली व चर्चासत्रांतून रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती केली जाते. तरी देखील नियमांचे उल्लंघन होत असल्याने महिनाभरात ७१ हजार ६५१ जणांवर कारवाई केली आहे. पनवेलसह नवी मुंबई व उरण परिसरात मोठ्या प्रमाणात वाहनांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यांचे वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करण्याचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे अशा वाहनांवर वाहतूक पोलिसांकडून कारवाई केली जात आहे. वाहतूक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरी भागात दुचाकीवरून तीन ते चार सीट प्रवास करणे, रिक्षांमधून पुढच्या सीटवर प्रवासी बसवणे, विद्यार्थी वाहनातून विद्यार्थ्यांना कोंबणे, हेल्मेट परिधान न करणे, सिग्नल यंत्रणेकडे दुर्लक्ष, सीट बेल्टचा वापर न करणे, विनापरवाना वाहन चालविणे याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. खारघर वाहतूक पोलीस चौकीत पोलिसांचे संख्या बळ कमी असतानाही ५ हजार १२८ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.



**गेल्या आठवड्यात सुमद्रात वादळवारा असल्याचे सांगितल्याने मुरूडमधील मासेमारीच्या बोटी येथील किनारी लागल्या होत्या. आता वातावरण सुधारल्याने मुरुडकरांच्या बोटी मासेमारीसाठी पुन्हा सज्ज झाल्या आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)**

# पनवेलमध्ये ठाकरे गटातर्फे आंदोलन

। पनवेल । प्रतिनिधी ।

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळणेबाबत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षातर्फे राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि.८) पनवेल तहसील कार्यालय येथे आंदोलन करण्यात आले. यावेळी नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी राजश्री जोगी यांना निवेदन देण्यात आले.



अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसानीसाठी शेतकऱ्यांना कर्जमाफी व सरसकट हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत मिळावी. तसेच, नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सर्व कर्जातून कर्जमुक्त करावे, अतिवृष्टीमुळे घरे व पशुधनाचे नुकसान झालेल्या नागरिकांना जुने निकष न लावता योग्य आणि पुरेसा मोबदला त्वरित देण्यात यावा, पिक विम्याचे कठीण निकष तातडीने शिथिल करून पंचनाम्याची प्रक्रिया बाजूला ठेवत विम्याची रक्कम तरी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, अशा प्रकारच्या प्रमुख मागण्यांचे निवेदन देण्यात आले. तसेच या सर्व मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्यात याव्या, अन्यथा शिवसेनेच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देखील देण्यात आला. यावेळी शिवसेना उपनेते बबनदादा पाटील, जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्यासह महिला आघाडी, कार्यकर्ते आणि शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मूर्तीची नासधूस करणारा अटकेत

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यातील डोलघर गावातील भवानीमातेच्या मूर्तीची नासधूस करण्याचा प्रयत्न एका तरूणाकडून करण्यात आला. या प्रकरणात पनवेल तालुका पोलिसांनी त्या तरुणाला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, डोलघर येथील आदेश खोत येथील भवानी मातेच्या मंदिरामध्ये घुसला. त्याने भवानी मातेच्या मूर्तीची नासधूस करण्याचा प्रयत्न केला. मूर्तीच्या तोंडावरील शेंदुराचा लेप काढून अपवित्र केले. या प्रकारामुळे ग्रामस्थांच्या धार्मिक भावना दुखावल्याने पनवेल पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली.

# उरण तालुक्यात धुळीचे साम्राज्य

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यात व शहर परिसरात सध्या उन्हाळा आणि पावसाचा लपंडाव सुरू आहे. या हवामानामुळे तालुक्यातील व शहरातील रस्त्यांवर उन्हाळ्यात धुळीचे आणि पावसाळ्यात चिखलाचे साम्राज्य पसरत आहे. त्याचा त्रास वाहनचालक, पादचारी आणि स्थानिक नागरिकांना सहन करावा लागत आहे.

तालुक्यातील मुख्य मार्गांवरून मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची ये–जा सुरू असते. अनेक वाहने ओव्हरलोड सामान घेऊन प्रवास करत असल्याने रस्त्यांवर पडणाऱ्या माती, वाळू आणि धुळीचे ढिगारे संपूर्ण वातावरण धूसर करतात. ऊन पडताच ही धूळ हवेत उडते, तर पाऊस आला की हेच रस्ते चिखलाने भरून दलदलीसारखे होतात. या परिस्थितीत मोटारसायकलस्वार आणि वाहन चालकांचा तोल सुटून अपघातांच्या घटना वाढत आहेत. रस्त्यांवरील खोल खड्ड्यांमुळेही अनेकांना जीवघेणा धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांच्या तक्रारीनुसार, या गंभीर परिस्थितीकडे शासकीय यंत्रणा पूर्णपणे दुर्लक्ष करत आहे. ना रस्त्यांची नियमित देखभाल केली जाते, ना धुळ नियंत्रणासाठी उपाययोजना करण्यात येतात. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि स्थानिक प्रशासनाने तातडीने रस्त्यांची दुरुस्ती, खड्डे बुजविणे व धुळ नियंत्रणाचे उपाय करावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# अनेक इच्छुक महिलांना संधी

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरूड–जंजिरा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाचे आरक्षण ओबीसी महिला म्हणून जाहीर झाल्यानंतर बुधवारी (दि.८) पालिकेच्या दहा प्रभागातील २० जागांची आरक्षण सोडत पार पडली. त्यात काही विद्यमानांचा पत्ता कट झाला असून नवीन इच्छुकांना संधी मिळाली आहे. येथील पालिकेच्या आरक्षण सोडत प्राधिकृत अधिकारी श्रीकांत गायकवाड व मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या अध्यक्षतेखाली नगरपरिषदेतील कार्यालयातील सभागृहात घेण्यात आली. त्यात प्रभाग क्रमांक १ ‘अ’ सर्वसाधारण महिला व ‘ब’ सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक २ ‘अ’ ना.मा.प्र. व ‘ब’ सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक ३ ‘अ’ ना.मा.प्र. महिला व ‘ब’ सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ४ ‘अ’ ना.मा.प्र. व ‘ब’ सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक ५ ‘अ’ ना.मा.प्र. महिला व ‘ब’ सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ६ ‘अ’ सर्वसाधारण महिला व ‘ब’ सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ७ ‘अ’ ना.मा.प्र. महिला व ‘ब’ सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ८ ‘अ’ अनुसूचित जमाती महिला व ‘ब’ सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ९ ‘अ’ अनुसूचित जमाती व ‘ब’ सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक १० ‘अ’ अनुसूचित जमाती महिला व ‘ब’ सर्वसाधारण असे आरक्षण जाहिर झाले आहे.

# दुचाकीस्वाराचा मृत्यू

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल–उरण मार्गावर करंजाडे येथे वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार चिन्मय पाटील (२२) याचा मृत्यू झाला आहे. तर, त्याचा मित्र निर्भय भगत (२१) गंभीर जखमी झाला आहे. चिन्मय आणि निर्भय हे दोघे दुचाकीवरून जात असताना एका वाहनाने त्यांना धडक दिली आणि त्याठिकाणाहून पोबारा केला. जमलेल्या नागरिकांकडून दोघांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र, उपचारादरम्यान चिन्मयचा मृत्यू झाला. पनवेल शहर पोलिसांनी वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल केला असून, त्याचा शोध सुरू आहे.

# उरणमधील मतदार याद्यांमध्ये घोळ

## निवडणुकीत पारदर्शकता राखण्याची मागणी

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. निवडणूक आयोगाने मतदार याद्या जाहीर करून हरकती घेण्याचे आवाहन केले आहे. परंतु, मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घोळ झाल्याचे राजकीय नेत्यांकडून सांगितले जात आहे.

तालुक्यातील कोप्रोली गावातील ग्रामपंचायत मतदार यादीत तालुक्यातील इतर गावांचे मतदार समाविष्ट झाल्याची माहिती मिळाली आहे. तसेच, खोपटे ग्रामपंचायतमधील ३७ मतदार हे गावात वास्तव्य नसतानाही कोप्रोली यादीत समाविष्ट आहेत, असे ग्राम पंचायत सदस्यांनी स्पष्ट केले आहे. तसेच, उरण विधानसभा मतदारसंघातही अनेक परप्रांतीय मतदार उरणमध्ये वास्तव्यास आहेत; परंतु, त्यांची नावे त्यांच्या मूळ गावाच्या यादीतही आहेत. त्यांची दोन्ही ठिकाणी नावे असल्यामुळे मतदारांना अनुचित फायदा मिळत आहे, असा आरोप स्थानिक राजकीय नेत्यांकडून करण्यात आला आहे. राजकीय नेत्यांची मागणी आहे की, निवडणूक आयोगाने परप्रांतीय मतदारांची सखोल चौकशी करून त्यांची नावे योग्य मतदार संघात ठेवावी, जेणेकरून निवडणुकीत पारदर्शकता राखली जाईल. ग्रामपंचायतीने देखील याबाबत हरकत नोंदवली आहे.

परंतु, संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई किंवा नाव कमी करण्याची पावले उचलली जात नाहीत, असा आरोप ग्रामपंचायत सदस्यांकडून केला जात आहे.

**प्रगतीचा आलेख खुंटला | खोटी स्तुती करणाऱ्या कार्यकर्त्यांचा दिखावा**

# माथेरानमध्ये लोकनेत्यांचा दुष्काळ

। माथेरान । प्रतिनिधी ।

माथेरान या ठिकाणी अल्प मताधिक्य असल्याने वरिष्ठ पातळीवरील राजकीय पक्षांची नेतेमंडळी येथे कायमच दुर्लक्ष करीत आहे. केवळ लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या काळात आपल्या पारड्यात हजारो मते मिळतील, या अनुषंगाने येथील कार्यकर्त्यांना गोंजारत असतात. अल्प मतदार संख्या असल्यामुळे मुळात त्यांना या स्थळाचा सर्वांगीण विकास करावयाचा नाही. त्यामुळेच हे सुंदर स्थळ आजही विकासाच्या प्रतीक्षेत दिसत आहे. त्यामुळे माथेरानमध्ये नेहमीच लोकनेत्यांचा दुष्काळ असतो.

अनेक वर्षांपासून माथेरानच्या विकासाच्या प्रगतीचा आलेख खुंटलेला आहे. स्थानिक लोक विविध समस्यांना सामोरे जाताना



व्यावसायाभिमुख रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्याने त्रस्त झाले आहेत. पर्यटन वाढीसाठी प्रयत्न करण्यासाठी हाडाचा लोकनेता नसल्याने एकप्रकारे या गावाला बेवारसपणा दिसून येत आहे. २०१६च्या निवडणुकीनंतरच्या कालखंडात प्रशासक राजवट सुरू झाली. वीज, पाणी, रस्त्यांची वाताहत झाली होती, त्याकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी येथे लोकनेता नसल्याने लोकांना वाऱ्यावर सोडून दिल्यासारखे चित्र निर्माण झाले आहे. जो तो स्वतःच्या सोयीनुसार राजकारण करत असून आपल्या व्यवसायात आर्थिक भर कशी पडेल, याकडे पाहिले जात आहे. जी मंडळी आजही आगामी निवडणुकीसाठी सज्ज झाली आहेत, त्यांना या गावाबद्दल काहीएक स्वारस्य दिसत नसून आपण कधी एकदा नगरपरिषदेच्या सभागृहात स्थानापन्न होतोय याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. निवडणुकीनंतर जे पराभूत होतात ते पुढील पाच वर्ष एकप्रकारे गावाशी फारकत घेतल्याप्रमाणे वावरताना दिसतात. तसेच, या पाच वर्षांत सत्ताधारी गावाचा विकास करत आहेत की गावाला अधोगतीला नेत आहेत, याकडे दुर्लक्ष करून स्वतःच्या व्यवसायात मग्न होत असतात. केवळ निवडणूक काळात येथील नागरिकांना गोंजारले जाते आणि सत्तेत सहभागी असणारी मंडळी सुद्धा निवडणुकीत केलेला खर्च वसूल करण्यात व्यस्त असतात.

‘तळे राखी तो पाणी चाखी’ हे जरी सर्वश्रुत असले तरी सुद्धा लोकांना अभिप्रेत असणारी महत्वपूर्ण कामे मार्गी लावल्यास मतदार सुद्धा त्यांच्या कृष्णकृत्याकडे कानाडोळा करू शकतात. परंतु, दर पाच वर्षांनी या सर्व उमेदवारांचे तेच तेच जाहीरनामे पाहून जनता अक्षरशः कंटाळून गेली आहे. अल्प मतदानामुळे वरिष्ठ नेते मंडळी काही केल्या येथील कामे करण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. त्यातच चार वर्षे उशिरा निवडणुका होत असल्याने मतदार राजा व्याजासहित आर्थिक लाभ घेण्यासाठी तत्पर असल्याचे दिसून येत आहेत. त्यामुळे आगामी काळात पार पडणाऱ्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत व्यावसायिक नेत्यांनी गावाच्या विकासासाठी सुद्धा प्रयत्नशील असणे गरजेचे आहे. विशेष म्हणजे दोन महिन्यांनंतर होणाऱ्या नगरपरिषदेच्या निवडणुकीचे वारे आतापासूनच घोंगावत असून ज्यांना राजकारणाची व्याख्या काय असते याचे सुतभर ज्ञान नाही, अशीही मंडळी आर्थिक लोभापायी खोटी स्तुती करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या दिखाव्याला बळी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे स्थानिकांकडून बोलले जात आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# मोदी विरुध्द राहुल

बिहारमध्ये निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. नोव्हेंबरमध्ये दोन टप्प्यात मतदान होणार असून १४ तारखेला निकाल लागतील. गेल्या लोकसभा निवडणुकांमधील यशानंतर विरोधकांना महाराष्ट्र व हरियाणामध्ये अनपेक्षितरीत्या मोठा फटका बसला होता. या मतदानामध्ये भाजपने भानगडी केल्या असाव्यात असा सार्वत्रिक संशय होता व आहे. महाराष्ट्रात सोलापूर जिल्ह्यात मारकडवाडीमध्ये मतदारांनी जुन्या पध्दतीने फेरमतदान घेण्याची तयारी केली होती. पण ते सरकारने होऊ दिले नव्हते. त्यानंतर राहुल यांनी पुराव्यांनिशी निवडणूक आयोगाला उघडे पाडले. त्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या बिहार निवडणुकीला कमालीचे महत्व प्राप्त झाले आहे. राहुल यांनी व्होटचोरीचा मुद्दा करून मध्यंतरी काढलेल्या यात्रेला त्या राज्यात मोठा प्रतिसाद मिळाला होता. जागोजाग बरीच गर्दी झाली होती. त्यामुळे बिहारमध्ये भाजप वा आयोगावर सर्वांचेच कडक लक्ष राहील. राहुल यांनी बंगळुरुमधील महादेवपुरा भागात एकेका घरात शंभर दोनशे मतदार राहत असल्याचे, एकेका मतदाराचे नाव अनेक ठिकाणी असल्याचे तसेच बोगस नावे व पत्ते असल्याचे पुरावे दिले होते. निवडणूक आयोगाने त्याला उत्तर दिले नाही. राहुल यांचे आरोप खोटे आहेत इतकेच तो म्हणाला. याच दरम्यान बिहारमध्ये मतदारयादीची व्यापक तपासणी सुरू करण्यात आली. अचानक लाखो लोकांची नावे उडवून टाकण्यात आली. यादीत पुन्हा नाव येण्यासाठी मतदारांना त्यांच्या आईबापांच्या जन्माचे पुरावे मागण्यात येऊ लागले. मग हे प्रकरण न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयाने सांगूनही आधारकार्ड हा पुरावा मानण्यास आयोग तयार नव्हता. अखेर न्यायालयाला आदेश द्यावा लागला. आता अंतिम यादी प्रसिध्द झाली असून तिच्यातही असंख्य भानगडी कायम आहेत. एका घराच्या पत्त्यावर चारशे ते पाचशे लोक राहत असल्याचे दाखवण्याचे प्रकार आहेत. मतदारांची नावे व पत्ते समजणार नाही अशा भाषेत आहेत. शिवाय वगळलेल्यांमध्ये महिलांचे प्रमाण जास्त आहे. हा सर्व खेळ नेमका कोणाच्या फायद्यासाठी करण्यात आला हे कदाचित निवडणुकीचे निकाल लागल्यानंतरच कळेल. पण यामध्ये मतदार, विरोधी पक्ष, सरकारी यंत्रणा यांचा प्रचंड वेळ व पैसा खर्च झाला असून या सगळ्यांना भलत्याच गोष्टीत अडकवून ठेवण्याचा हा भाजपचा कट होता की काय याचाही तपास व्हायला हवा.

## तेजस्वींपुढचे रेवड्यांचे आव्हान

काँग्रेस व लालू यादव यांचा राष्ट्रीय जनता दल यांची बिहारात युती आहे. लालू यांनी भाजपला विरोध व धर्मनिरपेक्षता या मुद्द्यावर सोनिया तसेच राहुल यांची भक्कम पाठराखण केली आहे. व्होट चोरी यात्रेत राहुल व तेजस्वी यादव यांच्या भाषणांवर गर्दी खूष होती. आता या दोन्ही पक्षांनी लवकरात लवकर जागावाटप संपवायला हवे. त्यात काँग्रेसने आपला पारंपरिक माज सोडून तेजस्वी यांना झुकते माप द्यायला हवे. तेजस्वी यांना मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून जाहीर करायलाही काँग्रेस खळखळ करते आहे. तो मूर्खपणा आहे. गेल्याच निवडणुकीत तेजस्वी जवळपास मुख्यमंत्रिपदापर्यंत गेले होते. पण नितीशकुमार यांच्या ज्येष्ठत्वामुळे व दबावामुळे त्यांना उपमुख्यमंत्रिपदावर समाधान मानावे लागले. नितीश यांनी नंतर संधिसाधूपणा करून पलटी मारली व पुन्हा भाजपशी पाट लावला. त्यामुळे त्याचा बदला म्हणून तरी तेजस्वी यांचाच नेतेपदावर हक्क आहे. अर्थात, त्यांना त्यासाठी भरपूर मेहनत करावी लागेल. नीतीशकुमार यांचा सततचा पलटूपणा आणि गेल्या पंधरा वर्षांची राजवट यांना जनता वैतागली आहे. ती राजद व काँग्रेस महागठबंधनच्या बाजूने झुकू शकते. मात्र नीतीश व भाजप यांच्या सरकारने गेल्या काही दिवसात जनतेला रेवड्या वाटण्याचा जो धडाका लावला आहे त्याचा मुकाबला कसा करणार याचा महागंठबंधनाला विचार करावा लागेल. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेला शह देण्यासाठी काँग्रेसने प्रत्येक महिलेला अडीच हजार रुपये देऊ असे आश्वासन दिले. पण महिलांनी ते मानले नाही. बिहारमध्ये तर प्रत्येक महिलेला थेट दहा हजार रुपये दिले गेले आहेत. शिवाय प्रत्येक घरात आणखी सुमारे पाच ते दहा हजार रुपये जातील अशा योजना जाहीर होत आहेत. यांच्या प्रभावातून बाहेर काढून जनतेला महागठबंधनच्या नावाने मतदान करायला लावणे हे राहुल व तेजस्वीसमोरचे मोठे आव्हान असेल.

## नीतीश भाजपलाच नकोसे

निवडणूक म्हटली की भाजप व तिचे मोदींसकटचे सर्व नेते सर्व लाजलज्जा सोडून देतात. रेवड्या हा एक भाग झाला. वाटेल ते आरोप करून राळ उडवून देणे व आपल्या गुलाम असलेल्या मिडियाचा वापरक करणे ही भाजपची आणखी दोन हत्यारे आहेत. गेल्या वेळी, राहुल तुमचे मंगळसूत्र चोरणार आहेत हा मोदींचा आरोप हा त्याचा नमुना होता. बिहारमधील लढाई तर नीतीश व भाजपसाठी आणखी कठीण आहे. त्यामुळे अशा आरोपांचा कळस गाठला जाईल. बिहारमध्ये बांगलादेशी घुसखोर मोठ्या प्रमाणात घुसल्याचा प्रचार मोदी करीत आहेतच. निवडणूक आयोगाच्या आकड्यांमध्ये तसा कोणताही पुरावा मिळालेला नसला तरी मोदी बिनदिक्कत हा खोटा आरोप रेटतील यात अजिबात शंका नाही. हिंदी पट्ट्यात भाजपला एकहाती सत्ता न मिळालेले बिहार हे एकमेव राज्य आहे. यंदा ते काहीही करून जिंकायचे असे त्याचे स्वप्न आहे. त्यासाठी नीतीश यांना बाजूला करण्याचा प्रयत्न केला जात आहे. नीतीश यांची मानसिक स्थिती ठीक नसल्याचे दिसते आहेच. शिवाय त्यांच्या पक्षाला बदनाम करण्यासाठी भाजप आणखी छुप्या खेळ्या करून नीतीश यांच्या जागा कमी येतील असे पाहील. महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांचे पंख कापण्याचे जे प्रकार आता फडणवीस करीत आहेत ते नीतीश यांच्या बाबतीत निवडणुकीच्या आधीपासूनच सुरू झाले आहेत. या निवडणुकीतील तिसरे खेळाडू प्रशांत किशोर यांची भूमिका यात महत्वाची ठरू शकेल. नीतीश यांच्यावर ते जितके आरोप करतील तितके ते भाजपला फायदेशीर ठरेल. पूर्वी प्रशांत किशोर यांनी मोदींच्या प्रचाराचे काम केले आहे. आता त्यांनी जनसुराज्य नावाचा स्वतंत्र पक्ष काढला असला व ते भाजपवरही टीका करीत असले तरी त्यांच्याबाबत संशय कायम आहेत. एक मात्र खरे की, किशोर यांनी गेल्या एक वर्षापासून पूर्णपणे झोकून देऊन काम केले आहे. राज्यातल्या त्यांच्या यात्रेला मोठा प्रतिसाद होता. त्यामुळे मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत तेजस्वीच्या पाठोपाठ किशोर यांच्या नावाला लोकांची पसंती असल्याचे दिसले आहे. गंमत म्हणजे राज्यात भाजपकडे एकही नाव घेण्यासारखा नेता नाही. त्यामुळे मुख्यमंत्री करायचा झालाच तर केंद्रातूनच नेता पाठवावा लागेल. तूर्तास ते मोदींच्या नावाने मते मागत फिरतील. दुसरीकडे राहुल यांच्या काँग्रेसचा मुख्यमंत्री होण्याची शक्यता नसली तरी ते व्होटचोरीच्या मुद्याचा जनतेत किती परिणाम झाला आहे हे नक्कीच अजमावून पाहतील. त्यामुळे लढाई बिहारची असली तरी मोदी विरुद्ध राहुल असाही एक पदर तिला आहे.

विचार

# शत्रूचा मुकाबला करण्याची सिद्धता

***भारत-पाकिस्तान आणि रशिया-युक्रेन संघर्षात जगातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. भारताने थेट पाकिस्तानमध्ये घुसून विमानतळ, लष्करी तळ उद्ध्वस्त केले, तर युक्रेनने मॉस्कोत घुसून हल्ला केला. या हल्ल्यामुळे ड्रोनची उपयुक्तता सिद्ध झाली. इथून पुढे युध्दात ड्रोन आणि विमानांचे हल्ले रोखण्यावर भर असणार आहे. भारत त्यादृष्टीने तयारी करत अत्याधुनिक रडार यंत्रणा खरेदी करत आहे.***



प्रा. सुखदेव बखळे

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताने पाकिस्तानला धडा शिकवला असला, तरी या संघर्षाच्या काळात आपल्या कमकुवत बाजूही पुढे आल्या. लष्कराने प्रगत हवाई संरक्षण (एडी) रडारची खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय लष्कराने उत्तर आणि पश्चिम सीमेतील हवाई संरक्षण नेटवर्कमधील अंतर दूर करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. लष्कराची ४५ 'लो-अल्टिट्यूड लाइटवेट रडार' (ॲडव्हान्स्ड), ४८ 'एअर डिफेन्स फायर कंट्रोल रडार-ड्रोन डिटेक्टर' (एडीएफसीआर-डीडी) आणि १० 'लो-अल्टिट्यूड लाइटवेट रडार' (ॲडव्हान्स्ड) खरेदी करण्याची योजना आहे. हे 'एडी' रडार लहान रडार क्रॉस-सेक्शन (आरसीएस) वापरून हवाई वस्तू शोधण्यास, ट्रॅक करण्यास आणि त्यांच्याशी संपर्क साधण्यास सक्षम आहेत. मे महिन्यात भारतीय हवाई क्षेत्रात घुसलेल्या पाकिस्तानी ड्रोनचा शोध घेण्यासाठी त्यांचा वापर करण्यात आला. रडार म्हणजे 'रेडिओ डिटेक्शन अँड रेंजिंग.' ही एक विशेष इलेक्ट्रॉनिक प्रणाली आहे. ती लक्ष्यित वस्तूंची दिशा, अंतर आणि वेग निश्चित करण्यासाठी रेडिओ लहरी वापरते. 'एडी' रडार सैन्याला हवाई धोके शोधण्यास, ओळखण्यास आणि नष्ट करण्यास मदत करतात. सोप्या भाषेत सांगायचे तर रडारमध्ये दोन मुख्य घटक असतात. त्यातील ट्रान्समीटर रेडिओ सिग्नल पाठवतो. दुसरा घटक रिसीव्हर आहे. तो लक्ष्यातून परावर्तित सिग्नल प्राप्त करतो. लक्ष्याच्या स्थानाचे सलग क्षणी मोजमाप केल्याने त्याचा मार्ग मोजणे शक्य होते. १९३० आणि १९४० च्या दशकात प्रामुख्याने लष्करी वापरासाठी रडार विकसित करण्यात आले होते. युद्धात हवाई शक्तीच्या वाढत्या महत्वामुळे ती सैन्यासाठी एक आवश्यक बचावात्मक आणि नंतर आक्रमक प्रणाली बनले.

'एडी रडार'चे दोन मुख्य प्रकार आहेत. एक पाळत ठेवणारे रडार तर दुसरे अग्निनियंत्रण रडार. पाळत ठेवणारे रडार हवेत कोणत्या वस्तू फिरतात, यावर लक्ष ठेवतात. त्यात हेलिकॉप्टर, विमाने, ड्रोन आदींचा समावेश होतो. अग्नीनियंत्रण रडार पृष्ठभागावरून हवेत मारा करणाऱ्या तोफा किंवा क्षेपणास्त्रांना लक्ष्य करण्यास मदत करते. सध्या भारतीय लष्कर आणि भारतीय हवाई दल (आयएएफ) पाळत ठेवणारे आणि अग्नी नियंत्रण रडार अशा दोन्ही रडारांचा वापर करतात. भारतीय हवाई दल प्रामुख्याने उच्च आणि मध्यम-शक्तीचे रडार (एचपीआर आणि एमपीआर) वापरतात. ते शेकडो किलोमीटरच्या श्रेणीतील धोक्यांचा मागोवा घेण्यास सक्षम आहेत. ही रडार लढाऊ विमाने, शत्रूंची वाहतूक विमाने आणि अॅवाक्ससारख्या मोठ्या लक्ष्यांविरुद्ध वापरली जातात. सैन्यदलाच्या दोन्ही विभागाकडे काही कमी-स्तरीय कमी वजनाचे रडार (एलएलएलआर) देखील आहेत. ती कमी उंचीवर उडणाऱ्या लहान हवाई वस्तू शोधतात. भारतीय हवाई दलाकडे 'थ्री डी सेंट्रल ॲक्विझिशन रडार' आणि अन्य रडार आहेत. सैन्य 'फ्लायकॅचर', स्वदेशी 'ॲडव्हान्स्ड सुपर फ्लेडरमॉस' (यूएसएफएम) रडार आणि 'एडी टॅक्टिकल कंट्रोल' रडार वापरते.

लष्कराची जुनी रडार अपग्रेड करण्याची गरज बऱ्याच काळापासून जाणवत आहे. मे महिन्यात पाकिस्तानशी झालेल्या तीन दिवसांच्या संघर्षादरम्यान ही गरज आणखी अधोरेखित झाली. 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान शत्रूवर पाळत ठेवण्यासाठी आणि ड्रोनवर प्रतिहल्ला करण्यासाठी कमी किमतीचे ड्रोन वापरले गेले. शत्रूचे ड्रोन भारतीय हवाई क्षेत्रात घुसले. नंतर ते पाडण्यात आले. ड्रोनसारख्या लहान आणि कमी अंतर उडणाऱ्या हवाई वस्तूंचा सामना करण्यासाठी 'एलएलएलडबल्यूआर' आणि 'एडीएफसीआर-डीडी' रडार खरेदी केले जात आहेत. असे ड्रोन जुन्या 'एडी' प्रणालींना अक्षम करू शकतात किंवा गोंधळात टाकू शकतात. 'आरसीएस' (रडार सिग्नेचर) रडारद्वारे एखादी वस्तू किती सहजपणे शोधता येते, हे समजते. आधुनिक स्टेल्थ तंत्रज्ञानाचा उद्देश विमानाचे 'आरसीएस' कमी करणे हा आहे. नवीन रडार केवळ धोके शोधण्यास आणि ट्रॅक करण्यास सक्षम नसतील, तर धोक्याच्या तीव्रतेनुसार त्यांना प्राधान्यदेखील देतील. भारताच्या 'एडी' पायाभूत सुविधांमध्ये विमानविरोधी तोफा, रशियन एस-४०० आणि स्वदेशी आकाश क्षेपणास्त्र प्रणालीचा समावेश आहे. या प्रणालीने 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान पाकिस्तानला भारताचे लक्षणीय नुकसान करण्यापासून रोखले.

लष्कराकडे आकाशतीर प्रणाली आहे. ती रडार आणि विमानविरोधी तोफांना एकात्मिक हवाई प्रतिमा प्रदान करते. भारतीय हवाई दलाकडे 'आयएसीसीएस' (इंटिग्रेटेड एअर कमांड अँड कंट्रोल सिस्टीम) यंत्रणा आहे. ती घुसखोरांना रोखण्यासाठी आणि नष्ट करण्यासाठी सर्व हवाई संरक्षण प्रणालींमधील डेटा एकत्रित करते. संरक्षण विभाग सध्या मिशन सुदर्शन चक्रअंतर्गत एक व्यापक हवाई संरक्षण ढाल तयार करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. या संदर्भात, 'डीआरडीओ'ने अलीकडेच एकात्मिक हवाई संरक्षण शस्त्र प्रणाली (आयएडीडबल्यूएस) ची पहिली यशस्वी चाचणी घेतली. ही प्रणाली सर्व उंचावरील भूभाग, मैदाने, वाळवंट आणि किनारी भागात तैनात केली जाईल. ड्रोनच्या वाढत्या प्रसाराविरुद्ध आपली क्षमता वाढवण्यासाठी आणि विद्यमान संरक्षणातील काही ऑपरेशनल अंतर भरून काढण्यासाठी भारतीय लष्कराने ३० 'पॅसिव्ह सर्व्हेलन्स सूट अँड डिटेक्शन सिस्टीम्स' (पीएसएसडीएस) ची मागणी केली आहे. मानवरहित हवाई प्रणाली (यूएएस) चा वेगाने होणारा प्रसार लष्करी आणि महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा क्षेत्रांसाठी हवाई धोका निर्माण करत आहे. हे धोके अनधिकृत देखरेख आणि गुप्त माहिती गोळा करण्यापासून पेलोड वितरण आणि कामिकाझे हल्ल्यांपर्यंत आहेत. सध्या 'आर्मी एअर डिफेन्स' (एएडी) कडे अशा 'यूएएस' शोधण्यासाठी आणि ट्रॅक करण्यासाठी फक्त सक्रिय सेन्सर आहेत. त्यांची शोध आणि ट्रॅकिंग श्रेणी मर्यादित आहे. अशा सेन्सरचा वापर शत्रूच्या इलेक्ट्रॉनिक युद्धप्रणालींच्या कामात व्यत्यय आणू शकतो.

शत्रूराष्ट्रावरील देखरेख आणि प्रतिहल्ल्यासाठी सक्रिय आणि निष्क्रिय अशी दोन्ही सेन्सर्स एकत्रितपणे वापरणे आज भारतासाठी आवश्यक आहे. अशा 'यूएएस'च्या निष्क्रिय सेन्सर्सचा अभाव प्रभावी कार्ये करण्यासाठी ऑपरेशनल क्षमतेवर परिणाम करत आहे. 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी विविध प्रकारच्या ड्रोनचा व्यापक वापर झाला. मागील संघर्षांच्या तुलनेत लष्करी कारवायांच्या स्वरूपामध्ये मोठा बदल झाला. प्रस्तावित 'पीएसएसडीएस'ला रेडिओ सिग्नल इंटरसेप्शनद्वारे शत्रुत्वाच्या 'यूएएस'ची दिशा शोधण्यासाठी, ओळखण्यासाठी आणि प्रदर्शित करण्यासाठी एक 'निष्क्रिय रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन सिस्टीम' आणि 'थर्मल इमेजर', टीव्ही कॅमेरा आणि लेजर रेंजफाइंडर असलेली 'इलेक्ट्रो-ऑप्टिकल ट्रॅकिंग सिस्टीम' आवश्यक आहे. ही प्रणाली किमान ३.५ किलोमीटर अंतरावर ३० सेंटीमीटर व्यासाचे लहान ड्रोन शोधण्यास आणि सहा किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावर १.६ मीटर आकाराचे लहान 'यूएएस' शोधण्यास, लॉक करण्यास आणि स्वयंचलितपणे ट्रॅक करण्यास सक्षम असावी, अशी अपेक्षा आहे. 'पीएसएसडीएस'ला लष्कराच्या आकाशतीर एअर डिफेन्स कमांड आणि रिपोर्टिंग नेटवर्कशीदेखील जोडले जाईल. त्यामुळे ते द्वि-मार्गी डेटा एक्सचेंज हवाई संरक्षण वातावरणाचा अविभाज्य भाग बनेल. ते उंचावरील प्रदेशांपासून मैदाने, वाळवंट आणि किनारी भागात सर्व भूप्रदेशांमध्ये तैनात केले जातील. रडार आणि जॅमरसारख्या 'पॅसिव्ह सिस्टीम्स' रेडिओ लहरींसारखे सिग्नल उत्सर्जित करत नाहीत. त्यामुळे शत्रूच्या हल्ल्यापासून या यंत्रणा सुरक्षित राहतात आणि पॅसिव्ह सिस्टीम्स शांतपणे माहिती गोळा करत असतात.

पाकिस्तानने सोडलेले तुर्कस्तानचे ड्रोन आणि चीनी क्षेपणास्त्रे भारताने रोखली होती. या ऑपरेशनने स्वदेशी प्रणालींची किती गरज आहे, हे दाखवून दिले. 'आयएडीबल्यूएस' ही गरज पूर्ण करते. रशिया, चीन आणि इराणसारख्या देशांचे 'आयएडीबल्यूएस' अमेरिकेच्या हवाई शक्तीचा मुकाबला करतात. भारताची प्रणाली त्यांच्यासारखीच आहे; परंतु ती स्वदेशी आहे. ती भारताला हवाई धोक्यांविरुद्ध एक मजबूत ढाल प्रदान करते. ही बहुआयामी संरक्षण प्रणाली आहे. तिच्या चाचणीने सिद्ध केले आहे, की भारत स्वदेशी तंत्रज्ञानाद्वारे शत्रूचा मुकाबला करू शकतो. 'ऑपरेशन सिंदूर' मधून शिकत भारत आता भविष्यातील युद्धांसाठी तयारी करत आहे.

चर्चा आजची

# वि ... विमानतळाचा कि रखडलेल्या विस्थापनाचा

सुयोग आंग्रे

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी ११६० हेक्टर जमिनीचे संपादन करण्यात आले. २००७ ते २०१४ या काळात सिडको प्रशासन आणि शेतकऱ्यांमध्ये अनेक संघर्ष झाले. भूमि पुत्रांच्या जमिनी विकासासाठी आवश्यक आहेत, हे खरे असले तरी त्यांच्या पुनर्वसनाचा आणि सन्मानाचा प्रश्न तेवढाच जिव्हाळ्याचा होता. अनेक आंदोलने, बैठका, आणि समेट चर्चांनंतर सिडकोने सुमारे तीन हजार प्रकल्पग्रस्त कुटुंबांना ''सर्वोत्तम'' असे म्हटले जाणारे पॅकेज देण्याचे ठरवले. नवी मुंबई, पनवेल आणि उरण या परिसराला जागतिक नकाशावर नवी ओळख देणारा हा प्रकल्प विकासाच्या नव्या पर्वाची सुरूवात ठरणार आहे. मात्र या विकासकथेच्या पायाभूत रचनेत १० गावांतील शेतकऱ्यांच्या विस्थापनाचा मुद्दा पडद्याआड गेल्याचे वास्तव असणारे विदारक चित्र समोर आले आहे.

विमानतळ बाधितांना देण्यात येणाऱ्या पॅकेजनुसार शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित जमिनीच्या बदल्यात १२.५ टक्के विकसित भूखंड आणि अतिरिक्त १० टक्के जमीन देण्यात आली. म्हणजेच एकूण २२.५ टक्के विकसित जमीन प्रकल्पग्रस्तांच्या वाट्याला आली. तसेच सिडकोने सुरू केलेल्या विमानतळ कंपनीतील प्रत्येकी १० रुपये किमतीचे १०० शेअर्स देण्यात आले. पुनर्वसन क्षेत्रात घर बांधण्यासाठी १५०० रुपये प्रति चौरस फुट या दराने बांधकाम खर्च मंजूर करण्यात आला.

प्रत्येक कुटुंबाला ३६ हजार रुपयांचा जीवनावश्यक भत्ता आणि स्थलांतरासाठी ५० हजार रुपयांचा वाहतूक खर्च देण्यात आला. धार्मिक भावना लक्षात घेऊन गावातील मंदिरे नव्या ठिकाणी बांधण्यासाठी प्रत्येकी एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. तसेच प्रकल्पग्रस्त युवकांना कौशल्यविकास प्रशिक्षण देण्याचेही ठरले. वाटाघाटीच्या सुरुवातीच्या काळात शेतकऱ्यांच्या मागण्या स्पष्ट होत्या. संपादित शेतीच्या बदल्यात ६ कोटी रुपयांची भरपाई, ४० टक्के विकसित भूखंड, घरांच्या बदल्यात पाच पट जमीन, आणि प्रत्येक कुटुंबातील किमान एक सदस्याला प्रकल्पात नोकरी. तथापि, या सर्व मागण्यांची पूर्णतः पूर्तता झालेली नाही. काहींना पुनर्वसनाच्या जागा मिळाल्या असल्या तरी पायाभूत सोयी, रोजगार आणि स्थिर उत्पन्न यांचा प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहे.

आज या गावांतील अनेक शेतकरी कृषी क्षेत्राकडे परतलेले नाहीत. काहींनी पुनर्वसनाच्या जमिनीवर छोट्या व्यावसायिक गाळ्यांद्वारे उत्पन्नाचे पर्यायी मार्ग शोधले आहेत, तर काहींना घर मिळाले तरी स्थैर्य नाही. शहरविस्तार आणि महागाईच्या झपाट्याने वाढणाऱ्या दरांमध्ये त्यांचे रोजचे जगणे अवघड बनले आहे. पहिल्या टप्प्यातील विमानतळात १५ हजार रोजगार उपलब्ध होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. परंतु स्थानिक प्रकल्पग्रस्तांना या नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळालेले नाही, अशी त्यांची तक्रार आहे. सिडकोने कौशल्य प्रशिक्षणाचे आश्वासन दिले असले तरी प्रत्यक्षात फारच कमी लाभार्थ्यांना त्याचा फायदा झाला. त्यामुळे आजही अनेक प्रकल्पग्रस्त तरुण रोजगारासाठी भटकंती करत आहेत.

प्रकल्पग्रस्तांचा आणखी एक भावनिक मुद्दा म्हणजे विमानतळाचे नामकरण. त्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व करणारे नेते दि. बा. पाटील यांच्या नावाने विमानतळाला ओळख मिळावी, अशी मागणी गेल्या काही वर्षांपासून केली जात आहे. मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले असले तरी सरकारकडून अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. परिणामी, प्रकल्पग्रस्तांमध्ये नाराजी आहे. नवी मुंबई विमानतळ हा विकासाचा मोठा टप्पा आहे. हे नाकारता येणार नाही. मात्र या विकासामागील मानवी बाजू समजून घेणेही तेवढेच आवश्यक आहे. घरदार, शेती, आणि ओळखीचा मातीचा वास सोडून गेलेल्या या शेतकऱ्यांना आजही नवीन जीवनाशी जुळवून घ्यावे लाग ठेवले गेले, तरच नवी मुंबई विमानतळ खऱ्या अर्थाने ''लोकांचा'' प्रकल्प ठरेल.२६ टक्के सिडकोचा वाटा आजही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कंपनीत आहेत. या प्रकल्पात ज्या शेतक-यांच्या जमीनींचे संपादन सिडकोने केले त्या शेतक-यांसोबत सिडकोने वाटाघाटी आणि करार केला. मात्र या विमानतळ प्रकल्प कंपनीचा मोठा वाटा अदानी उद्योग कंपनीकडे आहे. सर्व अधिकार अदानी कंपनीकडे सोपवल्यामुळे करार करणारी सिडकोचे उच्चपदस्थ अधिकारी प्रकल्पग्रस्तांच्या नोकरी व व्यावसायासाठी येथे शब्द टाकू शकत नाही अशी स्थिती आहे.

लोकसंसद

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ; एक सुखद स्वप्नपूर्ती!



मुंबईतील सध्याच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील भार कमी करण्यासाठी मुंबईनजीकच दुसऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळाची गरज भासू लागली. त्यातूनच रायगड जिल्ह्यातील उलवे (आता नवी मुंबईचा भाग) येथे भरपूर जमीनीच्या उपलब्धतेमुळे एक आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याची कल्पना पुढे आली. पुढे अनेक अडचणींचे डोंगर पार करत ही कल्पना प्रत्यक्षात साकारली गेली आणि एकेकाळी नवी मुंबईकरांचेच नव्हे तर अवघ्या महाराष्ट्राचे स्वप्नातीत असलेले 'नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ' प्रत्यक्षात अवतरले आहे. एकूण ११६० हेक्टरवर उभारलेले हे पर्यावरणपूरक विमानतळ कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा उपयोग, हरित उर्जेचा वापर आणि जलसंधारण याने परिपूर्ण कारण्यात आले आहे. कमळाच्या आकाराचे भव्य डिझाईन असलेल्या या विमानतळाच्या उभारणीसाठी अंदाजे १९ हजार ६५० कोटी रुपये खर्च आला आहे. या विमानतळावर ५जी कनेक्टिव्हिटी, 'डिजी यात्रा' (बायोमेट्रिक-सक्षम डिजिटल प्रवास), टर्मिनल १ मध्ये ६६ चेक-इन काउंटर, २२ सेल्फ-बॅगेज ड्रॉप युनिट्स आणि २९ एरोब्रिजेस अशा अनेक आधुनिक सुविधा असणार आहेत. मुंबई महानगर परिसरातील द्रुतगती महामार्ग, मेट्रो, उपनगरीय रेल्वे, वॉटर टॅक्सी, इत्यादींद्वारे देशातील हे पहिले बहुउद्देशीय विमानतळ जोडण्यात आले आहे. 'लोकनेते दि.बा.पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळा' मुळे महाराष्ट्राची एक सुखद स्वप्नपूर्ती झाली आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# टपाल सेवांचा प्रवास; जुने दिवस व डिजिटल युगातील क्रांती

एक असा काळ होता जेव्हा टपाल सेवा म्हणजे भावनांचा हृदयस्पर्शी दुवा होता. हाताने लिहिलेली पत्रे, पोस्टकार्ड, आणि तारांसारख्या गोष्टींनी लाखो लोकांच्या भावना, विचार, आणि बातम्या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचत असत. पत्र लिहिल्यावर ती पत्रे पोहोचण्यास काही दिवस, आठवडे किंवा कधी-कधी महिने तर कधी वर्षे लागत असे. पूर्वीच्या काळी पत्रात भला मोठा मजकूर देखील लिहिता येत नसे. एका वाक्यात आपल्या भावना लोकांपर्यंत पोहचवल्या जात होत्या.

या आधुनिकतेच्या जमान्यात टपालाचे पत्र कालबाह्य होवू लागले आहे. पूर्वी ख्याली खुशाली कळवायची म्हटलं की, पत्रा शिवाय पर्याय नसायचा. मात्र आता काळ बदलला आणि सोशल मीडियाचा जमाना आला. त्यामुळे पोस्टाच्या पत्रातील सप्रेम नमस्कार, विनंती विशेष हा मायना नव्या पिढीला अपवादानेच माहिती आहे. असे असले तरी बदलत्या जमान्यात काळानुरुप बदलाचे आव्हान टपाल विभागाने स्वीकारुन नव नवे उपक्रम हाती घेतले आहेत. टपाल सेवा ही लोकांपर्यंत माहिती पोहोचवण्यासाठी, संवाद साधण्यासाठी आणि व्यवसायिक व्यवहारांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. ई-मेल आणि डिजीटल संवादाच्या युगात देखील टपाल सेवा विश्वासार्ह आणि किफायतशीर राहिली आहे. टपाल सेवांमुळे ग्रामीण भागांमध्ये देखील माहिती आणि वस्तू पोहोचवणे सोपे झाले आहे.


जागतिक टपाल दिनानिमित्त विविध देशांमध्ये टपाल कार्यालयांमध्ये विविध कार्यक्रम, चर्चासत्रे आणि प्रदर्शनांचे आयोजन केले जाते. यामुळे टपाल कर्मचाऱ्यांचे योगदान आणि सेवा याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली जाते. जगभरातील टपाल नेटवर्क लोकांना एकत्र ठेवण्याचे कार्य सतत करत असते. सन १९६९ सालापासून दि. ९ ऑक्टोबर हा आंतरराष्ट्रीय टपाल दिन पोस्ट विभागामार्फत साजरा केला जात आहे. भारतात १८५४ मध्ये कोलकाता येथून अधिकृत टपाल सेवा सुरु झाली. आजच्या युवापिढीला पत्र, पोस्टकार्ड आणि ग्रिटींग्जचे महत्व भासत नाही. एकेकाळी नागरिकांसाठी पत्र म्हणजे सर्वकाही होते. गेल्या २५ ते ३० वर्षांपूर्वी पत्र हे अनेकांच्या आयुष्याची लाईफ लाईन होती. टपाल हेच आपल्या संवादाचे प्रमुख माध्यम होते. पत्रास कारण की... या वाक्याने सुरूवात व्हायची अन् संपूर्ण कुटुंबाची खुशाली कळवायची. पोस्टमन काका आल्यास त्याच्यामागे धावत धावत आमचं पत्र आलं का? असा प्रश्न विचारायचा. त्या १५ पैशाच्या पत्रातून खूप आनंद मिळत होता. मात्र काळाच्या ओघात आता ही पत्रे इतिहास जमा झाली आहेत. पूर्वी एखादा टेलिग्राम (तार) आली तेव्हा एक संकेत असायचा काहीतरी वाईट घडले आहे. आणि एखादे पत्र आले की घरातील मंडळी समजून जायची की आनंदाची बातमी आहे. मात्र गेल्या १० ते १५ वर्षांपासून पत्राचा वापर कमी झाला आहे. आज पत्राची जागा ई मेल, सोशल मीडियाने घेतली आहे. घरातील नागरिक नोकरीनिमित्ताने कुटुंबापासून हजारो किलोमीटर दूर असले तरी ते सोशल मीडियाच्या माध्यमातून कुटुंबाशी संवाद साधत आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात नागरिक आधुनिक झाला. भविष्यातील आव्हाने लक्षात घेता पत्रव्यवहारापुरते मर्यादीत न राहता इतर सेवाही लागू करण्यास पोस्टाने सुरुवात केली आहे. पोस्ट सेवेला नागरिकांची पसंती. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात कॉम्प्युटर आणि मोबाईलवरून संदेश वाहन काही सेकंदात जगाच्या कानाकोपऱ्यात करता येते. मात्र प्रगत आणि अद्ययावत तंत्रज्ञान प्रणाली उपलब्ध असली तरी आजही महत्वाची कागदपत्रे, पेन्शन पोहोचवण्याचे काम पोस्ट ऑफीसच्या माध्यमातून पार पाडले जात आहे. नागरिकांकडून पोस्टाच्या सेवेला मोठ्या विश्वासाने पसंती दिली जात आहे. आपल्या सेवेतून लोकांचा विश्वास संपादन करणाऱ्या पोस्टल सेवेचा ९ ऑक्टोबर हा स्थापना दिवस, हा दिवस जागतिक टपाल दिन किंवा वर्ल्ड पोस्ट डे म्हणून साजरा केला जात आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

### ९ ऑक्टोबर

१) श्रीम.पुष्पा प्रफुल्ल राऊत रायवाडी, अलिबाग, ९-१०-१९४७
२)श्री.शांताराम वामन कोरगावकर चेंढरे-अलिबाग, ९-१०-१९४४
३)श्री.शशिकांत गजानन पाटील विद्यानगर, अलिबाग ९-१०-१९५१
४)श्री.मिलिंद बालकृष्ण कोलगे रामनाथ रोड, अलिबाग ९-१०-१९५७
५)श्री प्रदीप वसंत गोडबोले ब्राम्हणआळी, अलिबाग ९-१०-१९५८

## सुवर्णकण



साधकाची साधना कोणतीही असो कोणत्याही उपायाने, साधने ने हृदयातील परमेश्वर जागा करणे हेच परम ार्थ मार्गाची खरे रहस्य आहे.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

## नागरिकांना लुटणारे दोघे ताब्यात

**ठाणे :** नागरिकांची लुटमार करणाऱ्या दोघांना दहिसर पोलिसांनी अटक केली. दिनेश चतुर्वेदी आणि राकेश तिवारी अशी त्या दोघांची नावे आहेत. ते दोघे मद्यधुंद अवस्थेतील नागरिकांना घरी सोडण्याचा बहाणा करायचे. त्यानंतर निर्जनस्थळी नेऊन त्यांच्यावर हल्ला करून त्यांना लुटून पळून जायचे.

# मच्छीमार्केट वादाच्या भोवऱ्यात

## ● इनायत मुकादम यांची नगरपरिषदेला कायदेशीर नोटीस

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

**चिपळूण शहरातील नदीपात्रालगत उभारण्यात आलेले मच्छी-मटण मार्केट पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. माजी नगरसेवक व समाजसेवक इनायत मुकादम यांनी या मार्केटच्या गाळ्यांचा लिलाव करण्याच्या नगरपरिषदेच्या हालचालींवर आक्षेप घेत नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी विशाल भोसले यांना कायदेशीर नोटीस बजावली आहे.**



मार्केटची इमारत सन २००९ मध्ये उभारण्यात आली. मात्र, बांधकाम झाल्यापासून अनेक गाळे वापरात आलेच नाहीत. परिणामी आज ही इमारत जीर्ण अवस्थेत उभी आहे. लोखंडी शटर पूर्णपणे गंजलेले आहेत. भिंतींवरील प्लास्टर सुटले आहे, इमारतीत शेवाळ व झाडाझुडपे वाढलेली आहेत, तर पाण्याच्या टाक्या चुकीच्या ठिकाणी बसविण्यात आल्या आहेत. ६२ लाखांचे अंदाजपत्रकपर कामे ठप्प झाली आहेत.

सन २०२०मध्ये इमारतीचे मुल्यांकन करून आवश्यक नूतनीकरण व सुविधा उपलब्ध करण्यासाठी तब्बल ६२ लाखांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. या कामांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता सन २०२३ मध्ये मिळाली. मात्र, निधीअभावी आजतागायत ही कामे पूर्ण झाली नाहीत. परिणामी लिलाव प्रक्रियेवर सतत प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये गंभीर त्रुटी या पार्श्वभूमीवर नगर परिषदेनं वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली यांच्याकडून मटन-मासळी व भाजी मार्केटचे स्ट्रक्चरल ऑडिट करवून घेतले. या तज्ज्ञ अहवालात इमारतीतील तांत्रिक त्रुटी व दुरुस्तीच्या बाबी स्पष्टपणे नमूद करण्यात आल्या आहेत. विशेषतः शटर बदलणे, प्लास्टर नव्याने करणे, हवामानरोधक रंगसंगती, स्वच्छता अशा महत्त्वाच्या कामांचा समावेश आहे. मात्र, या सुचनांची अंमलबजावणी नगर परिषदेकडून करण्यात आलेली नाही, असा आरोप मुकादम यांनी केला आहे.

### मूलभूत सुविधांचा अभाव

या इमारतीला अद्याप भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले नाही. मंजूर आराखडा उपलब्ध नाही, शौचालयाची सुविधा नाही तसेच, सांडपाणी प्रक्रिया केंद्रही नाही. महत्वाचे म्हणजे ही इमारत पूररेषेत असल्याचे नमूद करून अशा जागी मार्केट कार्यान्वित करणे धोकादायक असल्याचा मुद्दा नोटिशीत मांडण्यात आला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आवश्यक दुरुस्त्या व प्रमाणपत्रांशिवाय लिलाव प्रक्रिया राबवली गेल्यास, त्यामुळे होणाऱ्या अपघात, नुकसान वा आर्थिक हानीस मुख्याधिकारीच वैयक्तिक जबाबदार धरले जातील, असा इशारा मुकादम यांनी दिला आहे. नागरिकांच्या व व्यवसायिकांच्या सुरक्षिततेशी खेळू नका, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

### थातुरमातूर दुरुस्ती सुरू

नोटिसमध्ये म्हटले आहे की, नगरपरिषद सध्या कुशल कामगार व योग्य निविदा प्रक्रिया न करता वरवरच्या व थातुरमातूर दुरुस्त्या करून गाळे वापरण्यायोग्य असल्याचा दिखावा करत आहे. या कामांवर लक्ष ठेवल्यानंतर व प्रत्यक्ष स्थळावरील छायाचित्रांवरून ही बाब स्पष्ट होत असल्याचा उल्लेखही करण्यात आला आहे.

## दोन मंदिरांमध्ये चोरी

**रत्नागिरी :** खेड तालुक्यातील शिरगाव खुर्द येथील काळकाईदेवी मंदिर आणि कुळवंडीतील शिवशंकर मंदिर या दोन मंदिरे फोडून चोरी झाली. चोरट्यांनी शिरगाव खुर्द येथील काळकाईदेवी मंदिराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. देवीच्या मंदिरातून पितळ धातूच्या ३ घंटा, दोन समया आणि सीसीटीव्ही डीव्हीआर असा मिळून २० हजाराचा ऐवज चोरून नेला. ही चोरी ३ आणि ४ ऑक्टोबर या कालावधीत झाली आहे. दरम्यान, रविवारी (दि.५) सकाळी कुळवंडी येथील शिवशंकर मंदिरातही चोरी झाल्याचे उघड झाले आहे.

# सुधागड तालुक्यात वन्यजीव सप्ताह साजरा

**| पाली | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यातील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा चिवे तसेच स्वामी विवेकानंद हायस्कूल येथे १ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. याचा मुख्य उद्देश वन्यजीवांचे संरक्षण आणि संवर्धन करणे, तसेच त्यांच्या संवर्धनाबद्दल लोकांमध्ये जागरूकता वाढवणे हा आहे.

या काळात वन्यजीव आणि पर्यावरणाचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी विविध कार्यक्रम आणि जनजागृती रॅली आयोजित केल्या जातात.



वन्यजीव सप्ताहनिमित्त वन्यजीवांचे संरक्षण करणे पर्यावरणासाठी वन्यजीव किती महत्त्वाचे कार्य करतात. उदाहरण म्हणजे तृणाचे भक्षण तृणभक्षी प्राणी करतात. त्यामुळे तृणावर पोसणारे किटकांचा प्रभाव राहत नाही व रोगराई पसरत नाही. त्यामुळे निसर्गाचा समतोल साधला जातो व तृणभक्षी प्राण्यांची संख्या वाढू नये म्हणून मांसभक्षी प्राणी तृणभक्षी प्राण्यांची संख्या नियंत्रित ठेवतात. तृणभक्षी प्राण्यांची संख्या नियंत्रित केली नाही तर ते शेतीचे नुकसान करतात म्हणून मांसभक्षी प्राणी पर्यावरणाचा समतोल राखण्याचे काम करतात. याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली.

## लाखोंचे दागिने लंपास

**रत्नागिरी :** छत्रपती नगर येथे हसिना अन्वर काझी यांचा बंगला आहे. चोरट्यांनी या बंगल्याची कडीकोयंडा उचकटून चोरी करून पोबारा केला. शेजारी राहणाऱ्या नातेवाईकांना सकाळी घर उघडे दिसले. त्यामुळे त्यांना संशय आला व त्यांनी फोन करून घरमालक हसिना काझी यांना बोलावून घेतले. ते आल्यावर त्यांच्या बंगल्यात चोरी झाल्याचे समझले. त्यांनी तातडीने रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात खबर दिली. फॉरेन्सिक टीमने पाहणी केली असता सुमारे १५ तोळे सोन्याचे दागिने आणि ४० हजाराची रोकड चोरट्यांनी पळवली असल्याचे समोर आले.

# जनतेची सेवा हीच ईश्वर सेवा: विजय मेथा



## ● माणगावात मोफत नेत्र तपासणी शिबीर

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर बुधवारी (दि.८) सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये जुने एसटी स्टॅन्डजवळ करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन १३१ रुग्णांची तपासणी करून ४९ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

विजयशेठ मेथा हे समाजात सामाजिक बांधिलकी ठेवून काम करीत असल्याने ते अशा प्रकारचे विविध सामाजिक उपक्रम माणगाव तालुक्यात राबवित असतात. गेल्या अडीच वर्षात २९४१ हुन अधिक रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया या शिबिरात यशस्वीपणे करण्यात आले. गोरगरीब जनतेला दृष्टी मिळाल्याचा आनंद वेगळाच असून जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा समजून यापुढेही हे शिबीर राबविणार असून माणगाव तालुका मोतीबिंदू मुक्त करण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

## नवीनचंद्र राऊत यांना पुरस्कार

**अलिबाग :** अखिल भारतीय आगरी साहित्य संस्थेचा साहित्य संगम सोहळा रविवारी (दि. ५) ग्रीन किंग रिसार्ट मंडल येथे साजरा झाला. यावेळी नवीनचंद्र राऊत (रा. बोरीस) यांना कोकण रत्न या राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी ॲड. मानसी म्हात्रे, मा. उपनगराध्यक्षा अलिबाग नगरपरिषद, कैलास पिंगळे व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. नवीनचंद्र राऊत यांना कोकण रत्न पुरस्कार मिळाल्याने त्यांचे सर्वत्र होत आहे. तसेच पंचक्रोशीत समाधान व्यक्त केले जात आहे.



# अतिवृष्टी, वन्यजीव प्राण्यांकडून शेतीचे नुकसान



**म्हसळा :** यावर्षी मान्सूनपूर्व पावसाने कोकणातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. त्यात भर म्हणजे आता रानडुकरे, माकडे, वानरे, केलट अशा वन्यजीव प्राण्यांकडूनही भातशेती आणि इतर तृणधान्य पिकांचे नुकसान सुरू आहे.

वन्यप्राण्यांची संख्या गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढली असून जंगलातील अन्नटंचाईमुळे हे प्राणी आता थेट शेती आणि वस्त्यांकडे धाव घेत आहेत. विशेषतः पावसाळी हंगामात या प्राण्यांचा धुमाकूळ वाढला आहे. या संकटामुळे अनेक शेतकरी शेतीपासून दूर जात आहेत.

## ● भरपाई देण्याबाबत शासनाची उदासीनता

सततच्या नुकसानामुळे आणि कोणतीही मदत न मिळाल्याने त्यांच्या मनात असंतोष निर्माण झाला आहे. शासनाने अद्यापही याची योग्य दखल घेतलेली नाही. महसूल व कृषी विभागाचे वारंवार निदर्शनास आणून दिले गेले. तरी ना पंचनामे होत, ना नुकसान भरपाईची प्रक्रिया सुरू झाली आहे.

# अनिल गलगले पुरस्काराने सन्मानित

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील अभिनव संस्थेच्या गौळवाडी येथील माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल गलगले यांना राज्य सरकारने सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले. कर्जत तालुका गणित मंडळाचे अध्यक्ष गलगले हे अनेक वर्षे कर्जत शहरातील अभिनव प्रशालेत सेवेत होते आणि त्यामुळे त्यांना महाराष्ट्र शासनाच्या माध्यमिक विभागाचे आदर्श शिक्षक पुरस्काराची मोहोर उमटली आहे.



विषय तज्ञ् म्हणून आघाडीवर असलेले अनिल गलगले यांनी आपल्या शैक्षणिक वाटचालीत अनेक उपक्रम राबविले आहेत. कर्जत तालुका गणित मंडळाचे अनेक वर्षे अध्यक्ष म्हणून विज्ञान प्रदर्शन साजरी करून विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक कल्पनेला वाव देण्यासाठी अनिल गलगले यांचे योगदान महत्वाचे राहिले आहे. गलगले यांच्या या कार्याची दखल महाराजस्त्र शासनाच्या दखल घेतली असून यावर्षीचा राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# अखेर ‘हायटेक’ बसस्थानकाचे काम सुरू

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

सहा वर्षाच्या प्रतिक्षेनंतर अखेर चिपळूणच्या ‘हायटेक’ बसस्थानकाचे काम सुरू झाले आहे. मात्र, राज्य सरकारकडून बसस्थानकाच्या कामासाठी पुरेसा निधी मिळालेला नाही. तो वेळेत मिळाला नाही तर पुन्हा काम बंद पडण्याची भिती आहे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या बसस्थानकाची इमारत जीर्ण झाली होती, ती तोडून त्या जागी नव्याने सर्व सोयी सुविधांनीयुक्त ‘हायटेक’ बसस्थानक उभारण्यास सहा वर्षांपूर्वी सुरुवात झाली. मात्र ठेकेदाराने वेळेत काम सुरू केले नाही.

### पूर्णत्वाकडे सर्वांचे लक्ष

अनेक अडचणींमुळे बसस्थानकाच्या बांधकामाचा बट्ट्याबोळ उडाला.

रत्नागिरी जिल्ह्यातील सर्वच बसस्थानकाचे नुतनीकरण केले जात असताना चिपळूणच्या मध्यवर्ती बसस्थानकाचे काम रखडले त्याबद्दलही आश्चर्य व्यक्त केले जात होते. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मुंबई-गोवा महामार्गालगत असलेल्या शिवाजीनगर बसस्थानकाच्या दुरूस्तीसाठी निधी दिला. त्यामुळे पावसाळ्यात चिपळूण आगाराचे काम शिवाजीनगर बसस्थानकावरून सुरू झाले. गणेशोत्सवासाठी चिपळुणात एसटीने येणाऱ्या चाकरमान्यांची मोठी गैरसोय दुर झाली. मात्र विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी व राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मध्यवर्ती बसस्थानकाचे काम पुन्हा सुरू व्हावे, म्हणून शासनाकडे पाठपुरावा केला. मात्र ठेकेदाराने कामाला सुरवात केली नाही. त्यामुळे एसटी महामंडळाने पूर्वीच्या ठेकेदाराचा ठेका रद्द केला. त्यानंतर दुसरा ठेकेदार नेमण्यात आला. त्यानेही काम सुरू केले नाही. त्यामुळे त्यालाही बदलण्यात आले. दोन ठेकेदार बदलेपर्यंत बसस्थानकाच्या इमारतीचा केवळ पाया रचण्यात आला होता. सिमेंट काँक्रीटचे पिलर उभे करण्यात आले होते. परिवहन महामंडळाने दुसरा ठेकेदार रद्द केल्यानंतर उर्वरित कामासाठी २ कोटी ८७ लाख रुपये मंजूर करण्यात आले. त्यानंतर उर्वरित कामासाठी निविदा प्रक्रिया करण्यात आली. तेव्हा बसस्थानकाच्या कामाला तिसरा ठेकेदार मिळाला.

गणेशोत्सवादरम्यान पाऊस प्रचंड असल्यामुळे कामाला सुरवात झाली नाही. दसऱ्यानंतर पाऊस कमी होताच ठेकेदाराने बसस्थानकाच्या कामाला सुरवात केली आहे.

## गेल्या तीन महिन्यांत लाखो ग्राहकांचा सहभाग | प्रतिबिलात मिळतेय दहा रुपयांची सवलत

# महावितरणच्या ‘गो-ग्रीन’ योजनेला पसंती

**| मुंबई | प्रतिनिधी |**

वीजबिलांच्या छापील कागदांचा वापर बंद करण्यासाठी ‘गो-ग्रीन’ या महावितरणने सुरू केलेल्या योजनेला वीजग्राहकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. गेल्या तीन महिन्यांमध्ये तब्बल २ लाख ३ हजार ३४० वीजग्राहकांनी या योजनेत सहभाग घेतला आहे.

वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ इमेल व एसएमएसचा पर्याय निवडून सोमवार (दि.६) पर्यंत लघुदाब वर्गवारीतील पर्यावरणस्नेही ७ लाख ६ हजार ९२४ ग्राहक या योजनेत सहभागी झाले आहेत. त्यांना ८ कोटी ४८ लाख ३० हजार ८८० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

या ‘गो-ग्रीन’ योजनेतील वीजग्राहकांचा वाढता प्रतिसाद सहभाग स्वागतार्ह आहे. त्यांना वीजबिल डिजिटल स्वरुपात पाठवले जात आहे. पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी वीजग्राहकांनी या योजनेत सहभागी व्हावे’, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे.




वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला राज्यात प्रतिसाद वाढत आहे. विशेष म्हणजे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या तीन महिन्यांमध्ये २ लाख ३ हजार ३४० ग्राहकांची या योजनेत भर पडली आहे. यात सर्वाधिक पुणे प्रादेशिक विभागातील ८७ हजार ४० ग्राहकांचा तर कोकण प्रादेशिक विभागातील ७८ हजार ८२९ ग्राहकांचा समावेश आहे.

महावितरणकडून गो-ग्रीनचा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. यात ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक १२० रुपयांचा फायदा होत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे. या योजनेत आतापर्यंत ७ लाख ६ हजार ९२४ पर्यावरणस्नेही वीजग्राहक सहभागी झाले आहेत.

### योजनेत सहभागी होण्यासाठी हे करा

गो-ग्रीन योजनेसाठी महावितरणच्या www.mahadiscom.in या वेबसाइटवर किंवा मोबाईल ॲपवर नोंदणी करण्याची स्वतंत्र सोय उपलब्ध आहे. केवळ ग्राहक क्रमांक सबमीट करावे लागेल व छापील बिलाची प्रत रद्द करून संबंधितांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांक व इमेलवर दरमहा बिल पाठविण्यात येईल. नोंदणीकृत मोबाईल किंवा इमेल बदलण्याची सोयदेखील त्याच ठिकाणी उपलब्ध आहे.

### असे असणार योजनेचे फायदे

गो-ग्रीन सहभागी झालेल्या ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत इमेलवर व मोबाईल एसएमएसद्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही ऑनलाईन बिल भरणे सोयीचे झाले आहे. इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणक किंवा मोबाइलमध्ये जतन करून ठेवता येते. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

## निवडक



### विद्यार्थी गुणगौरव, कोजागिरी उत्साहात

**तळा :** तळा येथील गुजराती-मारवाडी संघटनेतर्फे गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा दांडिया नृत्य व कोजागिरी पौर्णिमा अतिशय उत्साही व आनंदी वातावरणात श्री राधाकृष्ण नामदेव मंदिरात पार पडली. तळा बाजारपेठेत बहुतांशी दुकाने गुजर मारवाडी या लोकांची आहेत. हळूहळू एक-दोन करताकरता वीस ते पंचवीस कुटुंबे या ठिकाणी स्थायिक झाली आहेत. त्यातूनच वीस वर्षांपूर्वी गुजराती मारवाडी ही संघटना उदयाला आली. या संघटनेमार्फत सामाजिक स्तरावर दांडिया नृत्य (गरबा) खेळ दरवर्षी पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. विशेषतः नवरात्र उत्सव आणि दांडिया हे एक समीकरण गुजराती-मारवाडी लोकांचे वैशिष्ट्य समजले जाते. तसेच एकत्र एखादी सहल वर्षातून आपले कुटुंबासह आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व कोजागिरी आनंदी व उत्साही वातावरणात साजरी करीत असतात. या कार्यक्रमात वृद्ध, युवक-युवती, महिला, पुरुष यांचा सहभाग उत्साहाने जाणवत होता. यानंतर रात्री सर्वांचे स्नेहभोजन झाले. त्यानंतर दांडिया नृत्य रात्रीपर्यंत खेळले. याप्रसंगी मान्यवरांचे हस्ते विद्यार्थ्यांना भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले.



### अन्नदानाने सेवा सप्ताहाचा समारोप

**नागोठणे :** लायन्स क्लब इंटरनॅशनलकडून संपूर्ण जगभरात सेवा सप्ताह राबविण्यात आला. नागोठणे लायन्सकडून नागोठण्यात विविध उपक्रमांनी राबविण्यात आलेल्या सेवा सप्ताहाचा समारोप शाळेतील विद्यार्थ्यांना अन्नदान करून करण्यात आला. नागोठणे लायन्स क्लबचे चार्टर्ड प्रेसिडेंट ला. प्रकाश जैन यांच्या सौजन्याने कचेरी शाळेत पार पडलेल्या या अन्नदान कार्यक्रमाचा रायगड जिल्हा परिषदेच्या नागोठण्यातील कचेरी शाळा, कन्या शाळा व जोगेश्वरी नगर शाळा या तीन शाळांतील एकूण ८६ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. यावेळी नागोठण्याचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य डॉ. मिलींद धात्रक, ज्ञानेश्वर साळुंके, सुप्रिया काकडे, लायन्स क्लबचे अध्यक्ष सखाराम ताडकर, चार्टड प्रेसिडेंट प्रकाश जैन, विशाल शिंदे, डॉ. अनिल गिते, विवेक सुभेकर, सुधाकर जवके, यशवंत चित्रे, सुनिल कुथे, संजय काकडे, विजय शहासने, दिपक लोणारी, सिध्देश काळे, सुजाता जवके विद्या म्हात्रे आदींसह तिन्ही शाळांतील शिक्षिका यावेळी उपस्थित होत्या.

### वीजचोरांवर धडक कारवाई

**पालघर :** पालघर जिल्ह्यात वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांवर महावितरणने धडक कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली आहे. आकडा टाकून किंवा मीटरमध्ये छेडछाड करून धोकादायक मार्गाने वीज चोरणाऱ्या तब्बल ३११ ग्राहकांना गेल्या पाच महिन्यांत रंगेहाथ पकडले आहे. एप्रिल २०२५ ते ऑगस्ट २०२५ या पाच महिन्यांच्या काळात या ग्राहकांकडून ५३.३६ लाख रुपयांचे वीज देयक (दंड) आकारण्यात आले आहे. पालघरमधील बोईसर ग्रामीण, डहाणू, जव्हार, पालघर, सफाळा, तलासरी आणि विक्रमगड या भागांमध्ये वीज चोरीची सर्वाधिक प्रकरणे उघडकीस आली आहेत. महावितरणने कारवाई केलेल्या ३११ वीजचोरांना एकूण ५३.३६ लाख रुपयांचे देयक (दंड) देण्यात आले आहे. यापैकी १५२ ग्राहकांनी सुमारे ३६.२७ लाख रुपये दंड भरला आहे. उर्वरित १८२ ग्राहकांनी अद्याप दंड आणि वीज बिल भरलेले नाही. या ग्राहकांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येऊ शकतो, असेदेखील महावितरणने सांगितले आहे. त्यामुळे या ग्राहकांनी लवकरात लवकर विजबिल भरणे आवश्यक आहे. महावितरणने पालघरमधील जवळपास चार लाख वीज ग्राहकांना सुरक्षित आणि सुरळीत विद्युतपुरवठा देण्यासाठी वीज चोरीविरोधातील ही मोहीम यापुढेही सुरूच राहील, असे स्पष्ट केले आहे. तसेच, नागरिकांनी अनधिकृत वीज वापर टाळून अधिकृत मीटरद्वारेच विजेचा वापर करावा, असे आवाहनही महावितरणने केले आहे.



### विविध उपक्रमांतून सेवा सप्ताह साजरा

**कोलाड :** लायन्स क्लब ऑफ इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३१ ए ४ चा ऑक्टोबर सेवा सप्ताह विविध उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. या सेवा सप्ताहात डिस्ट्रिक्टमधून रिजन झोनसी सलग्न असलेले सर्व लायन्स क्लबमधील मेंबर्स एकत्रित येऊन १ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर या कालावधीत विविध उपक्रम राबवले. कोलाड परिसरात या सप्ताहाच्या निमित्ताने सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरण, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध प्रकारचे उपक्रम क्लबच्या माध्यमातून राबविण्यात आले. या सेवा सप्ताहात नेत्र तपासणी शिबीर, मोती बिंदू शस्त्रक्रिया, आरोग्य तपासणी, शालेय शैक्षणिक साहित्यांचे वाटप, गरजूंना अन्नधान्य व कपडे, ब्लँकेट वाटप करण्यात आले. तसेच महिलांसाठी नवरात्रौत्सवात फनी गेम, वृद्धाश्रमात फळे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर वृक्षरोपण असे विविध उपक्रम करण्यात आले.

### भात कापणीची कामे लांबणीवर

**पालघर :** पालघर जिल्ह्यात ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पावसाळी ढगाळ वातावरण कायम आहे. त्यामुळे भात कापणीची कामे लांबणीवर पडली आहेत. सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस झालेल्या जोरदार पावसामुळे शेतांमध्ये पाणी आणि चिखल कायम असून यामुळे शेतकऱ्यांना भाताची कापणी करण्यास अडचण निर्माण झाली आहे. यावर्षी झालेल्या सातत्यपूर्ण पावसामुळे भाताच्या पिकाची चांगली वाढ झाली होती. मात्र सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस झालेल्या जोरदार पावसामुळे भाताचे पीक मोठ्या प्रमाणात शेतामध्ये आडवे झाले होऊन नुकसान झाले आहे. जिल्ह्यातून १० ते १२ ऑक्टोंबर दरम्यान पावसाच्या माघारीला सुरुवात होण्याची शक्यता आहे. जोपर्यंत स्वच्छ वातावरण आणि पावसाची पूर्ण उघडीप मिळत नाही, तोपर्यंत भात कापणीला सुरुवात करणार नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

## निवडक



### तळ्यात इच्छुक उमेदवारांची मोर्चेबांधणीला सुरुवात

**तळा :** अनेक दिवसांपासून प्रतिक्षेत असणाऱ्या तळा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाले असून तळा नगराध्यक्षपद हे आता ओबीसीसाठी राखीव आहे. त्यामुळे अनेक इच्छुकांच्या स्वप्नांना गती आली असून उमेदवारी कोणाला मिळेल, यासाठी तालुकावासीयांसह इच्छुकांनाही उत्सुकता आहे. तळा नगरपंचायत झाल्यानंतर प्रथमच नगराध्यक्षपदासाठी ही थेट निवडणूक होत असून थेट नगराध्यक्षपदाचा मान आता कोणत्या ओबीसी पुरुष किंवा महिलेला मिळणार, याची चर्चा सर्वत्र सुरू झाली आहे. नगराध्यक्षपदासाठी सर्वसाधारणसाठी इच्छुकांची संख्या जास्त होती; परंतु, नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष किंवा महिला आरक्षण निघाल्यामुळे या इच्छुकांची मोठी पंचायत झाली आहे. आता ओबीसी पुरुषाला आपल्या गटाकडून, पक्षाकडून उभे करण्यासाठी वरिष्ठ नेत्यांपासून स्थानिक नेत्यांपर्यंत सर्वजण शोध चर्चा बैठका घेण्याची तयारी सुरू झाली आहे.

### पेण नगरपालिकेचे आरक्षण जाहीर

**पेण :** उच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपर्यंत निवडणूक प्रक्रिया पुर्ण करण्याचे आदेश दिल्यानंतर निवडणूक प्रक्रियेच्या कामाला वेग आला आहे. त्यामध्ये पेण नगरपालिकेत १२ प्रभागांमध्ये २४ जागांचे आरक्षण जाहीर झाले आहे. त्यात प्रभाग क्रमांक १ 'अ' महिला ना.मा.प्र. व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक २ 'अ' महिला सर्वसाधारण व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ३ 'अ' ना.मा.प्र. महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ४ 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ५ 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' ना.मा.प्र. सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ६ 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' अनुसुचित जाती सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ७ 'अ' ना.मा.प्र महिला, व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ८ 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' ना.मा.प्र. सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ९ 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक १० 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ११ 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' अनुसुचित जमाती सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक १२ 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' ना.मा.प्र सर्वसाधारण असे आहेत. या आरक्षणामुळे इच्छुक उमेद्वारांची नक्कीच धाकधूक वाढली आहे. पेण नगरपालिकेच्या सभागृहामध्ये प्रांतधिकारी प्रविण पवार यांच्या अध्यक्षतेखाली प्रभागातील आरक्षणाची सोरट काढण्यात आली. या सोरटीसाठी मुख्याधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी जीवन पाटील, प्रशासन अधिकारी गणेशसिंघ ठाकूर, नगरपालिका कर्मचारी, तसेच राजकीय पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.



### आझाद मैदानावर आंदोलकांचा एल्गार

**पाली/बेणसे :** भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्था नागोठणे आणि वंचित बहुजन माथाडी कामगार युनियन अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार (दि.७) मुंबईतील आझाद मैदानात प्रमाणपत्र धारक प्रकल्पग्रस्तांनी बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. ३२४ प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नोकऱ्या द्या, अन्यथा आमच्या जमिनी परत करा, असा एल्गार पुकारत रिलायन्स नागोठणे कंपनी विरोधातील आंदोलन चांगलेच पेटले आहे. जोपर्यंत रिलायन्स नागोठणे कंपनी प्रशासन नोकरीत रुजू होण्याचे पत्रक देऊन कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेत नाही तोपर्यंत बेमुदत आमरण उपोषण सुरूच राहील, असा इशारा भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्था नागोठणेचे अध्यक्ष गंगाराम मिनमीने व पदाधिकारी तसेच प्रकल्पग्रस्तांनी दिला आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **खुद्द अलिबाग मध्ये १ बेड हॉल किचन फ्लॅट भाडेतत्त्वावर** द्यावयाचा आहे. भाडे ₹ १५.००० डिपॉझिट ₹ ६०,०००. एजंट क्षमस्व फोन नंबर ९८६९४५९०६३.
- **पाहिजेत!!! अलिबाग येथील दुकानात आणि टायर साठी** अनुभवी किंवा फ्रेश मुले हवी आहेत. कॉम्प्युटर बिलिंग साठी मुले हवी आहेत.संपर्क:८१४९४८०६८४
- **अकाऊटंट पाहिजे.** पात्रता- Bcom, Tally अनुभव- ५ वर्षे ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार २५००० महिना, Contact- 9823585321
- **नोकरीची संधी** - सफाई कर्मचारी (बर्गर्स आणि बूच, रांजणपाडा, अलिबाग) आमच्या टीममध्ये सामील होण्यासाठी आम्ही एक मेहनती आणि प्रामाणिक व्यक्ती शोधत आहोत. तपशील: पगार: ₹१३,०००/ महिना+ टिप्स/सेवा (७%) राहण्याची व्यवस्था आणि जेवण साप्ताहिक सुट्टी : मंगळवार कामाचे तास : दुपारी १२ ते रात्री ११ (दररोज किमान २ तासांच्या ब्रेकसह) व्हाट्सॲपवर कॉल करा : ७५०६९५४६११/ ९९३०६३४००३
- **आवश्यक :** सहाय्यक कर्मचारी खाजगी बंगल्याच्या साफसफाईसाठी आणि देखभालीसाठी जबाबदारी आणि विश्वासू व्यक्तींची आवश्यकता आहे. दैनंदिन घरकाम, सामान्य देखभाल आणि पाहुण्यांच्या व्यवस्थेत मदत करणे या कर्तव्यांमध्ये समाविष्ट आहे. पूर्णवेळ/राहणे पसंत. पूर्वीचा अनुभव इष्ट. स्थान : नागाव, संपर्क : ९८२०४१४८११ बैठकीची तारीख ११ ऑक्टोबर २०२५, सकाळी ११ वाजल्यापासून सुरू. किमान वयोमर्यादा १८ ते ३५ वर्षे आहे.
- **दुकान गाळा विक्री करणे आहे.** अलिबाग एस.टी.स्टँड जवळ ९७६४५४८६७९
- **अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी** १० वी पास मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२३२३५०५६/८१४९६७३०१८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# स्त्री परिचारिकांचे मागण्यांसाठी आंदोलन

## जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या कारभाराचा फटका



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद आरोग्य विभागातील उपकेंद्रामध्ये स्त्री परिचारिका म्हणून कार्यरत असलेल्या महिलांच्या अनेक प्रश्नांकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे परिचारिकांनी आंदोलनाची भूमिका घेतली असून मंगळवारी (दि.७) जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. मागण्या पुर्ण न झाल्यास आंदोलनाची तीव्र भूमिका घेतली जाईल, असा इशारा आई संघटनेच्यावतीने परिचारिकांनी दिला.

जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाखहून अधिक आहे. जिल्ह्यात १ हजार ८००हून अधिक गावे आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य राखण्यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या अखत्यारित ५५ आरोग्य केंद्र व २८८ उपकेंद्र आहेत. या केंद्राद्वारे ग्रामीण भागातील रुग्णांना सेवा देण्याचे काम केले जाते. रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी, आरोग्य सेविका यांच्या मदतीसाठी कंत्राटी स्वरुपात अर्धवेळ स्त्री परिचारीका यांची नियुक्त करण्यात आली. जिल्ह्यातील उपकेंद्रामध्ये ३४० हून अधिक महिला स्त्री परिचारिका म्हणून कार्यरत आहे. उपकेंद्र व परिसरातील स्वच्छता राखणे, वैद्यकिय अधिकारी, आरोग्य सेविका यांना मदत करणे अशा अनेक प्रकारची कामे केली जातात. अर्धवेळ स्त्री परिचारीका या निकषावर महिलांची भरती केली आहे. परंतु, त्यांना पुर्ण वेळ काम करावे लागत आहे. तरीदेखील स्त्री परिचारीका वेळेचा विचार न करता, केंद्रात काम करतात. तुटपुंज्या मानधनामध्ये महिला काम करीत असतानादेखील ते मानधन वेळेवर मिळत नाही. स्त्री परिचारिकांच्या विविध प्रश्नांबाबत अनेक वेळा प्रशासनासह शासनाकडे मागणी करण्यात आली आहे. परंतु, त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी परिचारिकांनी अलिबागमधील जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या कार्यालयासमोर मंगळवारी धरणे आंदोलन केले. यावेळी अर्धवेळ स्त्री परिचारीका महिलांचे मानधन वाढविण्यात यावे, समान काम, समान वेतन या तत्वानुसार मानधानत वाढ करावी, शासकीय सेवेत सामावून घ्यावे. गणवेश व ओळखपत्र देण्यात यावे. सरकारी कल्याणकारी योजना व सवलती लागू करण्यात याव्यात, अशा अनेक मागण्यांसाटी त्यांनी आंदोलन सुरु केले आहे.

### पाच महिने वेतनापासून वंचित

**रायगड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये अर्धवेळ स्त्री परिचारीका म्हणून काम करणाऱ्या महिलांना शंभर रुपये दिवस या प्रमाणे ३ हजार रुपये मानधन दिले जाते. वाढत्या महागाईमध्ये हे मानधन फारच अत्यल्प आहे. परंतु, हे मानधन देखील वेळेवर मिळत नसल्याचा आरोप परिचारिकांनी केला आहे. गेली पाच महिने शासनाकडून मानधन मिळाले नाही. त्यामुळे कुटूंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा, असा प्रश्न निर्माण झाला आहे. गणेशोत्सव, नवरात्रौत्सव मानधनाविना गेला. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. ग्रामीण भागातील या महिलांच्या समस्यांकडे प्रशासन व शासन दुर्लक्ष करीत असल्याचे सांगण्यात आले आहे.**

# माथेरान नगरपालिकेच्या प्रभागांची सोडत

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या हालचालींना सुरवात झाली असून आता नगराध्यक्ष आरक्षणानंतर महिला आरक्षण आणि सोडत कार्यक्रम करण्यात आला. अंतिम प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर आरक्षणाकडे सर्वाचे लक्ष लागून राहिले होते. त्यानुसार मंगळवारी (दि.७) नगरपरिषदेच्या स्वर्गीय हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे सभागृहात प्रभागांचे आरक्षण व सोडत कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

आरक्षण आणि सोडत पीठासीन अधिकारी प्रांत कर्जतचे प्रकाश संकपाळ यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सोडत पद्धतीने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व सर्वसाधारण महिलांसाठी राखीव ठेवण्याच्या जागा यांचे संरक्षण संबंधित अधिनियम निश्चित करण्यात आले. सोडतीच्या वेळेस प्रारूप प्रभाग रचनेचा नकाशा व त्याच्या चतुरसीमा दर्शनी ठिकाणी लावण्यात आली. या प्रसंगी माथेरान अधीक्षक तथा तहसीलदार सुरेंद्र सिंह ठाकूर, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी पीठासीन अधिकारी कर्जत प्रांत प्रकाश संकपाळ यांच्या आदेशानुसार आरक्षण सोडत सुरू केली. इयत्ता तिसरीमध्ये शिकणाऱ्या मीरा आखाडे या लहान विद्यार्थीनीच्या हस्ते चिठ्ठी काढण्यात आली.

### प्रभाग निहाय आरक्षण

**प्रभाग १ 'अ' नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग २ 'अ' नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग ३ 'अ' नागरिकांचा मागास प्रवर्ग व 'ब' सर्वसाधारण महिला, प्रभाग ४ 'अ' अनुसूचित जाती व 'ब' सर्वसाधारण महिला, प्रभाग ५ 'अ' अनुसूचित जाती महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग ६ 'अ' अनुसूचित जाती महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग ७ 'अ' अनुसूचित जमाती महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग ८ 'अ' नागरिकांचा मागास प्रवर्ग व 'ब' सर्वसाधारण महिला, प्रभाग ९ 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग १० 'अ' नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला व 'ब' सर्वसाधारण.**

## पतसंस्थेच्या सभासदांची दिवाळी गोड

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. उतेखोल या नामांकित पतसंस्थेच्या सभासदांची यावर्षीही दिवाळी गोड होणार आहे. दरवर्षी या पतसंस्थेचा वर्धापन दिन, विद्यार्थी गुणगौरव सोहळा मान्यवर व संस्थेचे संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. शिवाय ही पतसंस्था संकटग्रस्त व पूरग्रस्त नागरिकांच्या मदतीकरिता अग्रेसर असते. या संस्थेने आपल्या प्रगतीचे आणखी एक यशस्वी पाऊल टाकताना संस्थेची इंदापूर शाखा सुरु केली आहे. या पतसंस्थेतर्फे रौप्य महोत्सवी वर्षापासून संस्थेतील सभासदांची दरवर्षी दिवाळी गोड व्हावी हा उद्देश नजरेसमोर ठेऊन भेटवस्तू देण्याचा मानस केला आहे. यावर्षीही या संस्थेच्या सभासदांची दिवाळी गोड होणार आहे. संस्थेच्या सभासदांनी पतसंस्थेच्या कार्यालयात दि.१० ते १७ ऑक्टोबर या कालावधीत आपली भेटवस्तू स्वीकारावी, असे आवाहन संस्थेचे संस्थापक ॲड. राजीव साबळे, अध्यक्ष आनंद यादव, उपाध्यक्ष मदनलाल जैन यांच्यासह संचालक, व्यवस्थापक, कर्मचारी वृंद व स्वल्पबचत प्रतिनिधी यांनी केले आहे.



## नागावमध्ये ज्येष्ठ नागरिक दिन साजरा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नागाव येथे बुधवारी (दि.१) जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला. यावेळी ३० ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. अध्यक्ष जोशी यांच्यासह सोर्टे आणि वाळंज यांनी दीप प्रज्वलन केले. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना आरोग्याबद्दल माहिती दिली. तसेच, आपण या वयात आपला आहार कसा, किती प्रमाणात व कोणता घ्यावा, पाणी कसे व किती घ्यावे आणि आपण सर्वांनी निरोगी राहण्यासाठी कोणती काळजी घेतली पाहिजे, याविषयी माहिती दिली. या कार्यक्रमाच्या शेवटी भातखंडे यांनी सर्वांचे आभार मानले आणि कार्यक्रमाची सांगता केली.

## वसीम सावरटकर यांचा सत्कार

**। रोहा । प्रतिनिधी ।**

कोलाड येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समितीच्यावतीने शिक्षण क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. त्या अनुषंगाने रोहा नगरपालिकेच्या अष्टमी उर्दू शाळेतील शिक्षक वसीम सावरटकर यांना नुकतेच आदर्श शिक्षक म्हणून गौरविण्यात आल्याने अष्टमी मुस्लिम समाज बांधवांच्यावतीने समाज अध्यक्ष शफी पानसरे व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अजीम नाडकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## मातोश्रीच्या दारी चौलचे तोरण

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**



कोजागिरीची नव्या पौर्णिमेच्या निमित्ताने चौल मधील भाताच्या कणसाचे तोरण मातोश्रीच्या दारी बांधण्यात आले.

गेले पंचवीस वर्षे शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे हे मातोश्रीच्या दारी चौलचे भाताचे कणीसाचे तोरण बांधत आहेत.

चौलच्या भाताच्या कणीसाचे तोरण बांधण्याची परंपरा १९९८ सालापासून स्वर्गिय बाळासाहेब ठाकरे यांच्या आज्ञेने करण्यात आली होती. ती परंपरा आजतागायत सुरेंद्र म्हात्रे यांनी जपली आहे. हे तोरण दसऱ्याच्या मुर्हूतावर मातोश्रीच्या दारी बांधले जात असे; परंतु दसऱ्याच्या दिवशी शिवसेनेचा भव्य मेळावा असल्याने हे तोरण कोजागिरीच्या नव्या पोर्णिमेला मातोश्रीच्या दारी बांधण्यात आले. यावेळी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, विभाग प्रमुख मारूती भगत, पेण उपतालुका प्रमुख चेतन मोकळ, उपकार खोत, राजू शेवणईकर, सुनिल घरत, बाळू वर्तक, अल्पेश ठाकूर, राकेश काठे आदींसह शिवसेना कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी चौलच्या भाताचे तोरण शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांना सुपूर्द केले.

## फिजिओथेरपी सेंटरचे उद्घाटन

**। महाड । प्रतिनिधी ।**

आजच्या बैठी जीवनशैलीमुळे हालचाल बिघडणे, शारीरिक विकार, शारीरिक बिघाड, अपंगत्व आणि इतर तक्रारी वाढल्या आहेत. त्यांना वैद्यकीय सल्ल्याची आवश्यकता असते. इतक्या अप्रत्याशिततेसह, आपल्याला सर्वोत्तम वैद्यकीय तज्ञांकडून समर्थन मिळणे आवश्यक आहे, अशा प्रकारच्या विविध सेवा उपलब्ध असलेले प्रो-कायनेटिक फिजिओथेरेपी सेंटरचे नुकतेच खाडीपट्ट्यातील तुडील फाटा येथे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सेंटरचे उद्घाटन लोअर तुडील माजी सरपंच साजिद देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाले.

## रोह्यात नगराध्यक्षपदासाठी इच्छुकांची घोडदौड सुरू

**। चणेरा । प्रतिनिधी ।**



रायगड जिल्ह्यातील रोहा नगरपालिकेचे नगराध्यक्षपदासाठी असलेले आरक्षण घोषित करण्यात आले. रोहा नगरपालिकेला ओबीसी महिला हे आरक्षण असणार आहे. त्याचप्रमाणे नगरपरिषदेच्या कै. द.ग. तटकरे सभागृहात अष्टमी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुका आरक्षण व सोडत कार्यक्रम पार पडला. त्यामध्ये प्रभाग क्रमांक १ 'अ' महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक २ 'अ' महिला व २ 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ३ 'अ' महिला व 'ब' ना.मा.प्र., प्रभाग क्रमांक ४ 'अ' महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ५ 'अ' महिला व 'ब' ना.मा.प्र., प्रभाग क्रमांक ६ 'अ' महिला ६ व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ७ 'अ' ना.मा.प्र. महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ८ 'अ' महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ९ 'अ' ना.मा.प्र. महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक १० 'अ' ना.मा.प्र. महिला व 'ब' सर्वसाधारण असे आरक्षण जाहीर झाले आहे. त्यामुळे आता चांगलीचघोडदौडसुरू झालेली आहे.

## मोहोपाडा रस्त्याला भगदाड

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

मोहोपाडा येथील जनता विद्यालय व एचडीएफसी बँकेकडे जाणाऱ्या रस्त्याला मधोमध भले मोठे भगदाड पडले आहे. त्यामुळे प्रवाशांसह नागरिकांना आपला जीव मुठीत घेवून प्रवास करावा लागत आहे. या रस्त्यावर नेहमी वर्दळ चालू असते. या रस्त्याच्या मधोमध भगदाड पडले असून एका बाजूला वाहने पार्क केल्यामुळे पादचाऱ्यांना चालण्यासाठी रस्ता अपुरा पडून त्या भगदाडात पाय अडकून जायबंदी होऊ शकते. यासाठी एमआयडीसी प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## अरुंद रस्त्यामुळे अपघातात वाढ

**। मुरुड । प्रतिनिधी ।**



मुरुडच्या शासकीय अन्नधान्य वितरण गोदामामधून धान्य भरून ते खार आंबोली येथील रेशनिंग दुकानदाराला वितरण करण्यासाठी पिकअप टेम्पो निघाला होता. परंतु, परेश नाका ते दस्तुरी नाका दरम्यानचा रस्ता अरूंद असल्यामुळे या ठिकाणी टेम्पोचा अपघात झाला. समोरून येणाऱ्या वाहनाला साईड देत असताना धान्याने भरलेला टेम्पो साईडपट्टीवरून खाली कलंडला आणि अपघात झाला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसून टेम्पो चालक अमोद शामा सुखरूप आहे. परेश नाका ते दस्तुरी नाका या मार्गावर अनेकदा अपघात होत असतात. त्यामुळे अनेकांना जिव सुद्धा गमवावे लागले आहे. तरी लवकरात लवकर या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात यावे, अशी मागणी जनमानसातुन जोर धरत आहे.

**नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाची पुनर्रचना | आवर्ती, अनावर्ती खर्चास शासनावची मान्यता**

# विमानतळ परिसरात स्वतंत्र ठाण्याला मंजुरी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील सुरक्षेच्या दृष्टीने आता स्वतंत्र नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ पोलीस ठाणे स्थापन होणार आहे. राज्य शासनाने या नवीन पोलीस ठाण्याच्या निर्मितीला मंजुरी दिली असून, त्यासाठी विविध संवर्गातील एकूण १०८ निर्माण करण्यात येणार आहेत. या पोलीस ठाण्यासाठी ३.३८ कोटी रुपये आवर्ती व १.७६ कोटी रुपये अनावर्ती खर्चासही शासनाने मान्यता दिली आहे




नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा भूमिपूजन सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १८ फेब्रुवारी २०१८ रोजी कोंबडभुजे येथे पार पडला होता. विमानतळाचे बांधकाम पाच टप्प्यांमध्ये पूर्ण होणार असून, येथे ४ प्रवासी टर्मिनल्स, २ रनवे, १ कार्गो ट्रक टर्मिनल आणि संरक्षण तसेच नागरी हवाई वाहतूक विभागाशी संबंधित अनेक महत्त्वाच्या सुविधा उभारल्या जात आहेत. विमानतळ पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर प्रत्येक वर्षी ९ कोटी प्रवासी आणि ३६० कोटी मेट्रिक जाण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे वाहतूक आणि सुरक्षा लक्षात घेऊन या ठिकाणी स्वतंत्र पोलीस ठाण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. दरम्यान, जुलै महिन्यामध्ये नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाची पुनर्रचना करण्यात आली. या पुनर्रचनेत परिमंडळ-१ (वाशी) व परिमंडळ-२ (पनवेल) यांच्या पुनर्रचनेतून नवे तिसरे परिमंडळ-२ (बेलापूर) स्थापन करण्यात आले आहे. याच पुनर्रचनेत विमानतळ आणि त्याच्या आजूबाजूच्या परिसराची कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ पोलीस ठाणे प्रस्तावित करण्यात आले होते. त्यानुसार राज्याच्या गृह विभागाने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी स्वतंत्र पोलीस ठाण्याला मंजुरी दिली आहे.

### १०८ पदांचा समावेश

**शासन निर्णयानुसार, या नवीन पोलीस ठाण्यामुळे पनवेल, उलवे आणि नव्याने स्थापन होणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्द निश्चितीचा प्रस्ताव नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून लवकरच शासनास सादर करण्यात येणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विम ानतळाचे पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. त्यातच विमानतळ पोलीस ठाण्याची निर्मिती विमानतळ परिसराच्या सुरक्षेला आणि कायदा-सुव्यवस्थेला नवी बळकटी देणारी ठरणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ पोलीस ठाण्याकरिता नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या पदामध्ये पोलीस निरीक्षक २, सहाय्यक पोलीस निरीक्षक ३, पोलीस उप निरीक्षक ६, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ६, पोलीस हवालदार २७, पोलीस शिपाई ४२, महिला पोलीस शिपाई १९ व चालक पोलीस शिपाई ३ अशा एकूण १०८ पदांचा समावेश आहे.**

# गवईंच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध

। सुधागड–पाली । प्रतिनिधी ।

देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ सुधागड तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(अ) यांच्या वतीने तहसीलदार कार्यालय, सुधागड येथे जाहीर निषेध निवेदन सादर करण्यात आले. दोषीवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(अ), सुधागड तालुका यांच्यावतीने करण्यात आली आहे. यावेळी राहुल सोनावळे, भगवान शिंदे, आदेश कांबळे, राजेंद्र भालेराव, नितीन पडवळ, कविता पडवळ, दिलीप मोरे, सतीश गायकवाड,विकास सोनवणे, प्रफुल सोनावळे, सुरेश गायकवाड, सुनील गायकवाड, रुपेश गायकवाड, आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पनवेल महानगरपालिका, पनवेल
### जाहीर सूचना

**कामाचे नाव :-** पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये वडाळे तलाव येथे पनवेल महानगरपालिका आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रम साजरा करणेकरीता प्रायोजकत्वासाठी प्रस्ताव मागविणेबाबत.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये वडाळे तलाव येथे दिवाळी पहाट २०२५ या कार्यक्रमाचे आयोजन करणेत येत आहे. सदर कार्यक्रम साजरा करणेकामी महापालिकेमार्फत प्रायोजकत्वासाठी प्रस्ताव मागविणेत येत आहेत. सदरचे प्रस्ताव कार्यालयीन वेळेत दिनांक १५/१०/२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका मालमत्ता विभागात सादर करावेत.

सदर प्रस्तावांमध्ये कार्यक्रमाची रुपरेषा, अंदाजित सहभागी संख्या, अंदाजित खर्च, इ.बाबींचा समावेश असावा. उत्कृष्ट प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्थेस मुख्य प्रायोजकत्व बहाल करण्यात येईल. याबाबत अंतिम निर्णय मा.आयुक्त तथा प्रशासक, पनवेल महानगरपालिका यांचे राहतील, याची नोंद घ्यावी.

सही/-
**उपायुक्त (मालमत्ता)**
**पनवेल महानगरपालिका**

पमपा/माव्य/२४२५/प्र.क्र.२४/६९३/२०२५
दिनांक : ०८/१०/२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, श्री. दयानंद जयराम पाटील मु.खारसापोली पो.हमरापूर, ता.पेण, जि.रायगड हे येथील रहिवासी असून यांच्या मालकीची अविभक्त हिस्सा ०.३०.०० हे.आर. (गुंठे) क्षेत्र १. श्री.मुकेश मिश्रा २. श्री.आशिष पल, ३. अखिलेश सिंघ, ४. शाम उपाध्ये, ५. रिषिकेश नेरलेकर. रा.ऑफिस नं. ए/२०:१/२ गुरूकृपा सोसा. सानपाडा से.३ नवी मुंबई ४००७०५ आम्ही खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | गट क्रमांक | हिस्सा नं | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| दुतर्फा सापोली | दयानंद जयराम पाटील व इतर | ६१ | १ | ०.६०.७० | ९.०० |

वरील संपुर्ण मिळकती पैकी श्री.दयानंद जयराम पाटील यांच्या मालकीचा अविभक्त हिस्सा ०.३०.०० हे.आर. क्षेत्र खरेदीखताने विकत घेण्याचे ठरले आहे.

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत आम्ही स्वत: कायमस्वरूपी विकत घेत आहोत. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाच्या आत आमच्याकडे लेखी पुराव्यानिशी येऊन आमची खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आम्ही स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करू व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमच्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि.०९/१०/२०२५

**मुकेश मिश्रा व इतर चार**
रा.ऑफिस नं. ए/२०:१/२ गुरूकृपा
सोसा. सानपाडा से.३ नवी मुंबई ४००७०५
मो.९७६८२९०२७३/९७६८८४१२८७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. हासुराम पदम ठाकुर रा. वाशी तालुका-पेण, जिल्हा रायगड यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली आहेत.

मिळकतीचे वर्णन जिल्हा रायगड, तालुका पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, तलाठी सजा- तरणखोप, ग्रामपंचायत पाटणोली, मौजे पाटणोली येथील गट नं. १८/३ त्यासी एकुण क्षेत्र ०-२७-१० हे. आर. चौ.मी. आकार रु. ०-५४ पैसे पैकी श्री. हासुराम पदम ठाकुर यांचे हिश्श्याची ०.०३ ०० हे.आर.चौ.मी. ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याची ग्वाही विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून ७ (सात) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-०३-०० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहीत आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

पेण- रायगड.
दि. ०९/१०/२०२५.

सही /-
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं.१६. तळ मजला,
शिवाजी पथ. पेण- रायगड.४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की खालील वर्णनाची शेत मिळकत श्री. रूस्तुम गोदरेज जोशी यांची शेतमिळकत त्यांचे कुलमुखत्याधारक यांनी कायम खरेदीखताद्वारे विक्री करण्याचे ठरविले आहे. सदरचे मिळकतीबाबत माझे अशिल आणि शेतकरी लवकरच खरेदीखत करण्याच्या बेतात आहे. सदरच्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे आहे.

**शेत मिळकतीचे वर्णन**

| गाव | सर्व्हे क्र./ भूमापन क्र. | हिस्सा क्र/ उपविभाग क्र. | क्षेत्र हे. आर.पॉ. | आकार रू/पैसे |
|---|---|---|---|---|
| गव्हाण, ता.पनवेल, जि. रायगड | ३०७ | ३ | ०-३१-६० पो.ख. ०-०३-३० एकुण ०-३४-९० | १.६२ |
| गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड | ३२३ | १ | ०-०८-९० पो.ख. ०-०१-८० एकुण ०-१०-७० | १.२५ |

तरी वरील मिळकतीचे वर्णनांत नमुद शेतमिळकतींबाबत कोणत्याही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठेकरार, विकसन करारनामा, कुळहक्क वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा, महसूली वाद असल्यास त्याच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत माझे खालील पत्त्यावर पाठवून द्यावी. उपरोक्त दिवसांत जर कोणाकडून कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार खालील पत्त्यावर न मिळाल्यास माझे अशिल सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार चालणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : धुतूम, उरण
ता. ०७/१०/२०२५

सही / -
**ॲड. किशोर धनाजी ठाकुर**
कार्यालय: ऑफीस क्र.२, जय भवानी संकुल,
जय भवानी पेट्रोल पंप जवळ, जे.एन.पी.टी
कळंबोली रोड, पौंडखार गाव, पो.जासई
(व्हाया पनवेल-४१०२०६) ता.उरण, जि.रायगड.

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### निविदा अधिसूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील माणगांव आणि चिपळूण येथे एसएसई/एसॲडटी साठी गोदाम खोल्यांचे बांधकाम. **निविदा अधिसूचना क्रमांक : केआर-आरएन-डिव्हायसीईडब्ल्यू-स्टोर-2025-16 दिनांक: 09/10/2025, एकूण अंदाजित खर्च:** ₹23,93,153.58/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 15/10/2025, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 30/10/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. काम पूर्ण करण्याची मुदत: मॉन्सून सहित 6 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

## पनवेल महानगरपालिका
ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल-४१०२०६.

कार्यालय :- २७४५८०४०/४१/४२ ईमेल:-panvelcorporation@gmail.com
अग्निशमनविभाग:-२७४६१५०० फॅक्स नं:-०२२-७४५२२३३

प.म.पा./अ.वि./२६२१/प्र.क्र.१७/१८५४/२०२५ दिनांक : ०८/१०/२०२५

**(प्रथम मुदतवाढ)**

| अनु. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | निविदा क्र./प.म.पा. /अ.वि./२६२१/प्र.क्र.१७/ /२०२५ | पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभागातील कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांना PPE किट खरेदी करणे कामी. |

या ई-निविदेबाबतची विस्तृत माहिती शासनाच्या: http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि ०९/१०/२०२५ ते दि. १६/१०/२०२५ रोजी दुपारी ०५.०० वाजे पर्यंत उपलब्ध होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**उप आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

दि. ०८/१०/२०२५

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक श्री. केशव शंकर पाटील यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|
| तळाशेत ता.अलिबाग | ३८ | ०-९९-३० पो.ख. ०-१०-७० एकुण क्षेत्र १-१०-०० | १.७९ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी श्री. केशव शंकर पाटील यांच्या हिश्यातील क्षेत्र ०-३९-२५ हे. आर. पो.ख.०-०५-३५ हे. आर एकुण ०-४४-६० हे. आर. आकार ०.७१ रू.पै. ही मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु.पेझारी (पळी आंबेघर), पो.पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं.९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म.र अर्ज ३४५/२०२५

### जाहिर नोटीस

प्रति,
श्रीम. सिध्दीक नौशाद कलबसकर
रा. मु. पो. खारआंबोली, ता. मुरुड जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

निबंधक, जन्म-मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत आंबोली, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचे पती श्री. नौशाद अब्दुल रहेमान कलबसकर, यांचा जन्म दि. ०१/०६/१९७५ रोजी मौजे खारआंबोली, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आंबोली, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. ०१/०६/१९७५ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक १८/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही. आज ता. ०३/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक वालकू परशुराम बांगर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे कामतपाडा तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १६/२/ब | एकुण क्षेत्र ०-८३-०० हे आर पॉ | ३-५६ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०९/१०/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळमजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९. तळमजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड. कर्जत ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१

अर्जदाराचे वकील :

## जाहीर नोटीस

नि ९/ड

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश व. स्तर सो. यांचे कोर्टात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४५/२०२५

सौ. रोहिणी दत्तात्रेय ओतारी वगैरे — अर्जदार

विरूद्ध

श्री रमेश दिगंबर मिरजकर वगैरे — सामनेवाले

या जाहिर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

कै. हिराबाई दिगंबर मिरजकर यांचे निधन दि. २३/०३/२०१८ रोजी मुंबई येथे झालेले असून त्यांस अर्जदार हे कायदेशीर वारस असलेचे ठरविणेकरिता अर्जदार यांनी मा. न्यायालयांत वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जास कोणालाही व्यक्तीगत हरकत करावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मा. न्यायालयात दिनांक २८/१०/२०२५ पर्यंत हजर राहून आपल्या हरकती घ्यावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर सदर अर्जास/वारस दाखल्यास कोणाचीही कसलीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक ०७ माहे ऑक्टो सन २०२५ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपिक**
**मा.दि.न्या.व.स्तर. अलिबाग रायगड**

सही/-
**अधिक्षक**
**मा.दि.न्या.व.स्तर अलिबाग रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, १. श्री. गजानन वासुदेवराव पिंपळे, २. सुनीता गजानन पिंपळे, यांनी बिनशेती जमीन मिळकतीचे मालक, समिता गजानन राऊत यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे कोशाणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३३/२/अ/१ | ४.५०.०० | ४५.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, २१ (एकवीस) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत दि. ०८/१०/२०२५

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला,
ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता.कर्जत, जि.रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे शेलु, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिनीची मिळकत त्या मिळकतीचे मालक व कब्जेदार श्री. हेमंत वामन तरे यांचेकडुन आमचे अशिलांनी कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे शेलु, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| ७९ | ८ | ०.०६.१० ०.००.८० एकुण क्षेत्र ०.०६.९० | ०-९४ |

सदर मिळकत तदंगभुत सर्व हक्कहितसंबंध सुद्धा कायम विकत घेणेचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, मृत्युपत्रांकीत दान, साठेकरार, ताबाकब्जा, वहिवाट, पोटगी, लीन, चार्ज, भाडेपट्टा, जाणे येणेचे मार्ग, वारसाहक्क वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचे आमचे अशिल समजतील. तसेच कोणाचीही हरकत असल्यास व त्यांनी हरकत न नोंदविल्यास ती त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिली आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमचे अशिलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पत्ता :- मु. पो. शेलु,
ता. कर्जत, जि. रायगड.
मोबा. नं. ७७९८२१०७७८

**ॲड.निलेश सुदाम कुंभार**
खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे निकोप, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिनींच्या मिळकती त्या मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार यांचेकडुन आमचे अशिलांनी कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे निकोप, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिनींच्या मिळकती**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) | जमिन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| २४ | ५/ब | ०.०५.५० पो.ख. ०.००.०० एकुण ०.०५.५० | ०-०५ | श्रीम.उषा अशोक जोहारी श्री.परशुन अशोक जोहारी |
| २४ | ५/ड | ०.०६.०० पो.ख. ०.००.०० एकुण ०.०६.०० | ०-०६ | श्रीम.उषा अशोक जोहारी श्री.अशोक एन. जोहारी |

सदर मिळकती तदंगभुत सर्व हक्कहितसंबंध सुद्धा.

तरी सदर मिळकतींबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, मृत्युपत्रांकीत दान, साठेकरार, ताबाकब्जा, वहिवाट, पोटगी, लीन, चार्ज, भाडेपट्टा, जाणे येणेचे मार्ग, वारसाहक्क वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बोजाविरहित असल्याचे आमचे अशिल समजतील. तसेच कोणाचीही हरकत असल्यास ती त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिली आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पत्ता:- मु. मोहाचीवाडी-नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मोबा. नं. ९८३४०१९९३८

**ॲड. अक्षय मारुती पेमारे**
खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट

## मिळकतीचा फेर जाहीर लिलाव विक्री जाहीरनामा

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील नमुद केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा फेर जाहीर लिलाव शुक्रवार दिनांक १७-१०-२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि. रायगड येथे केला जाईल. फेर लिलावाच्या अटी व शर्ती विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करिता फेर जाहीर लिलावात भाग घेण्याकरिता अनामत रक्कम रु.२५,०००/- (अक्षरी पंचवीस हजार मात्र) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतिम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळून (७ दिवस) दिनांक १७-१०-२०२५ रोजी परंतु फेर लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने फेर जाहीर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचेकडून अनामत रक्कम भरुन घेवून त्यास फेर जाहीर लिलावात बोली लावण्यात अनुमती देण्याबाबत विचार करण्यात येईल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय फेर जाहीर लिलाव प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या फेर लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशील खालीलप्रमाणे :-**

| अ.क्र. | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसुली दाखला क्र. व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | कर्जदार १.श्री.सुप्रेश काशिनाथ बिर्जे मु.पो.आगरदांडा,ता.मुरुड,जि.रायगड जामिनदार २.श्री.शिवराम बापू लोकरे, मु.आपटा, पो.आपटा, ता. पनवेल जि. रायगड ३.श्री.तेजेस नंदकुमार अंबुकर, मु.थेरोंडा हनुमानवाडी, पो.चौल ता. मुरुड, जि. रायगड | अर्ज क्र./कलम/ १०१/८८/९/३/२३ | ४९,००,०००/- | मुरुड नगरपरिषद भूमापन क्र. १४०/२ब/२ क्षेत्र ०-०१-५८ हे.आर व भूमापन क्र.१४०/२ ब ३ क्षेत्र ०-०५-०७ पो.ख.०.००.३५ हे.आर |

**स्थावर मालमत्ता फेर जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती**
**अटी व शर्ती**

१) सोबतचे यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्याठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेंत येईल.
२) लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रु. २५०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३) वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४) शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्युअर (सक्षम अधिकारी) यांचे मूल्यांकन दाखल्याच्या किंमतीपेक्षा व वाजवी किंमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्वीकारली जाणार नाही.
५) सर्वात जास्त बोली स्वीकारणे अथवा न स्वीकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६) ज्यांचे नाव लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रकमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे. तसे न केल्यास फेर लिलाव केला जाईल.
७) ज्याचे नावे लिलाव पुरा करणेंत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करुन) सरकारी खजिन्यांत जमा करणेंत येईल.
८) विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्तेसंदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९) बोली किमान किती रकमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
१०) खरेदीदाराने कसूर केल्यास फेरलिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किंमतीपेक्षा फेर लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदारांकडून वसुल केली जाईल.
११) पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२) ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रकमेतून कमी करणेंत येईल.
१३) थकबाकीदाराने लिलाव उद्घोषणेप्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपुर्द केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किंमतीच्या ५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारावर परत केली जाईल.
१४) स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्युटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५) खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे.
१६) सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७) महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधित तरतुदी लिलाव खरेदीदारावर बंधनकारक राहतील.
१८) जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपूर्ण रक्कम भरुन विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेणाऱ्या इसमास त्याने भरलेल्या रकमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

दिनांक :- ३०-०९-२५

सही/-
**(श्री. मधुकर मामु ढेबे)**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी)**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी जिल्हा रायगड**

# मानसिक आरोग्य : समस्या आणि समाधान






**डॉ. अमोल भुसारे**
MBBS DPM मनोविकासतज्ज्ञ (७३५०६७२५५०)

परवाच जरा जुन्या मित्रांना भेटलो असचे आपले गेट टुगेदर! जुन्या आठवणीत रमलो! सहजच एका मित्राची आठवण झाली म्हणून एकाला विचारलं अरे तो काय करतो सध्या? समोरची व्यक्ती म्हणाली, ''अरे काय विचारतोस त्याच्याबद्दल! ठार psyco झाला आहे तो! तसा स्वभावाच त्याचा होता वेगळा! ''एवढ म्हणून तो व्यक्ति निघून गेला! पण मी मात्र विचारात पडलो. Psyco! म्हणजे तरी नक्की काय आणि किती सहज शाब्दिक प्रयोग केला त्याने. कारण मी ज्याची चौकशी करत होतो तो मित्र तसा सुस्वभावी होता आणि सगळ ठीक होतं हा मध्यंतरी अचानक त्याच्या अर्धांगिनीला देवाज्ञा झाली होती हे ऐकले होत. त्यानंतर मी त्याला भेटलो सुद्धा नव्हतो. खरच, किती बिझी झालोत आपण आणि अशा प्रसंगी भेटणं गरजेच असतं. मला माझ्याच बिझी असण्याचा राग आला! तो psyco झाला आहे अस म्हणतात लोक नक्कीच या प्रसंगातून त्याला सावरता आले नसेल का? त्याला भेटण्याच मी मनात नक्की केले. पण माझे विचार काही थांबेनात opd मध्ये सुद्धा अनेकदा असा अनुभव येतो एकाद्या स्त्रींचे पहिलच abortion होत आणि मग ती खचून जाते. खरचं आपल मन इतकं कमकुवत झाल आहे का? की आपण त्याची निगाच राखत नाही आहोत? आपल्या मनाचं आरोग्य आपण तपासून पहायला हव हेच खरं! आता


मानसिक आरोग्य म्हणजे मनाचे आरोग्य म्हणजे काय बरं?

मानसिक आरोग्य म्हणजे अशी कल्याणाची अवस्था जिथे व्यक्ती स्वतःच्या क्षमता ओळखते, दैनंदिन जीवनातील तणावाशी सामना करू शकते, उत्पादक पद्धतीने काम करते आणि आपल्या समाजाला योगदान देऊ शकते.''

मानसिक आरोग्य म्हणजे आपलं विचार, भावना आणि वर्तन यांचा समतोल ठेवून आनंदी, समाधानकारक आणि अर्थपूर्ण जीवन जगण्याची क्षमता. अजून सोप्या शब्दात म्हणजे आनंदाने जगता येणं! मान्य आहे. आपण खूप कामात बिझी झालो आहोत पण यातून ही आपण आनंद शोधतो आहोत का? आपल्या मनाला खरच छान वाटतंय का? चला आपणच स्वतःला हा प्रश्न विचारू! बघा किती वेग वेगळी उत्तर मिळतात? आपण आपल्या मनाची काळजी घ्यायला विसरलो आहोत .'काम एके काम'च्या नादात छंद, मित्र, फिरण्याचा आनंद गमावून बसलो आहोत. आपण आपल दुःख ही पटकन कोणाला सांगाव अस वाटत नाही. यामुळेच आपल मानसिक आरोग्य बिघडत चाललं आहे.

**आता मनाचं आरोग्य का महत्त्वाचं?**

शारीरिक आरोग्य जसे महत्त्वाचे आहे तसेच मानसिक आरोग्यसुद्धा तितकेच महत्त्वाचं आहे. परंतु दुर्दैवाने आपल्या समाजात अजूनही मानसिक आरोग्याकडे कमी गांभीर्याने पाहिले जाते. आपल्या मनात काय सुरू आहे एखादी गोष्ट आपण सहन करू शकत नाही हे आपण साधं कोणासोबत बोलू शकत नाही. खरच एवढे गैरसमज का करून घेतलेत आपण? मनाबद्दल मनाच्या आरोग्याबाबत कोणाशी बोलणं हा एक social taboo झाला आहे. हे होऊ नये म्हणून मानसिक आरोग्याबद्दलचे गैरसमज आणि सत्य सांगण्याचा हा एक छोटा प्रयत्न सर्वात महत्वाचे म्हणजे आपण आपल्या मनाला ठीक वाटत नाही तर आपण कोणाची मदत घ्यायला का घाबरतो? तो खूप डिप्रेशनमध्ये गेलाय तो psyco झाला आहे. आपण येवढंच बोलतो पण त्यामागच कारण शोधतंच नाही! मनाच्या या अवस्था म्हणजे काही वेड लागणं नाही! चिंता, अति काळजी, अपयश पचवता न येणं, एखादी गोष्ट स्वीकारता न येणं, आपल्या जवळच्या व्यक्तिचे अचानक जाणं, या गोष्टी आपण सहन करतो पण मग यातून बाहेर पडण्यासाठी मदत का नाही घेत? त्यामुळे नैराश्याचे प्रमाण वाढत आहे. बहुतेक मानसिक समस्या चिंता, नैराश्य, तणाव यासारख्या असतात आणि पूर्णपणे उपचार योग्य आहेत. व्यक्ती वेडी नसून हा एक आजार आहे. जो की उपचाराने बरा होतो, जस की पाय fracture झाला की तो व्यक्ती कायमस्वरुपी लंगडा होत नाही. उपचाराने तो पूर्णपणे बरा होतो. तसच आहे हे सगळं चला आपण या मानसिक समस्या बद्दल गैरसमज आणि सत्य तपासून पाहू.



**✲ फक्त कमजोर लोकांना मानसिक समस्या होतात? गैरसमज** : मानसिक आजार हे फक्त मानसिकदृष्ट्या कमजोर लोकांनाच होतात. सत्य: मानसिक आजार कोणालाही होऊ शकतात. इथे स्त्री पुरुष, लहान मुले मोठे व्यक्ती किंवा वृद्ध व्यक्ती, गरीब श्रीमंत, शहरी किंवा गावी राहणाऱ्या असा भेद राहत नाही यशस्वी, सामर्थ्यवान आणि ज्ञानी लोकांनाही.

**✲ मानसिक आजार बरे होत नाहीत? गैरसमज :** मानसिक आजार बरे होत नाहीत. सत्य: योग्य औषधोपचार, समुपदेशन आणि जीवनशैलीतील बदल यामुळे बहुतेक मानसिक समस्या पूर्णपणे सुधारतात. व काही आजारामध्ये दीर्घकालीन उपचार घ्यावे लागतात तर काही ठिकाणी उपचार घेवून मानसिक आजार हे कंट्रोल मध्ये राहतात जसे की मधुमेह, उच्च रक्तदाब या आजारा प्रमाणे

**✲ मानसोपचाराच्या डॉक्टरांकडे जाणं लाजिरवाणं आहे? गैरसमज:** मानसोपचारासाठी डॉक्टरांकडे जाणे लाजीरवाणे आहे. सत्य: आज आपण मनोविकार तज्ज्ञांकडे जाणे टाळतो. पण त्यांना जर आपण मनोविकासतज्ज्ञ म्हणाल आणि मानाल तर निश्चित हा stigma पण कमी होऊ शकतो. जसं आपण हृदय किंवा मधुमेहासाठी डॉक्टरांकडे जातो, तसंच मनाच्या आरोग्यासाठी तज्ज्ञांकडे जाणं सामान्य आणि धैर्याचे लक्षण आहे.

**✲ औषधं घेतली की आयुष्यभर त्यावर अवलंबून राहावं लागेल? गैरसमज :** मानसिक आजारासाठी औषधं घेतली की आयुष्यभर लागतात त्यांची सवय लागते. सत्य: अनेक मानसिक आजारांत औषधं तात्पुरती लागतात; परिस्थितीनुसार थांबवता येतात, फक्त डॉक्टरांचा सल्ला आवश्यक आहे.

इथे सवय म्हण्ण्यापेक्षा आपण त्यांची गरज असते असं बोललो तर हा stigma देखील कमी होईल.

**✲ मानसिक आजार देव-देवतांचा कोप किंवा वाईट शक्तीमुळे होतो? गैरसमज:** मानसिक आजार हा अध्यात्मिक कारणामुळे होतो. सत्य : मानसिक आजार मेंदूतील रासायनिक बदल, तणाव, आनुवंशिक कारणं, वातावरणीय घटक यामुळे होतो; याचा अध्यात्माशी काही संबंध नाही.

मानसिक आरोग्याच्या सर्वसाधारण समस्या-चिंता आणि काळजी, नैराश्य आणि उदासीनता, झोप न लागणे, विसरभोळेपणा, व्यसनाधीनतेची सवय

**तणावाची साखळी तोडा - उपाय आणि मार्ग-** १. व्यायाम व योग: शरीराला आणि मनाला उर्जा. २. पुरेशी झोप आणि संतुलित आहार: दिनचर्येतील समतोल. ३. मनमोकळा संवाद : आपल्या भावना शेअर करा. ४. छंद जोपासा : वाचन, संगीत, चित्रकला - मनाला आनंद द्या. ५. डिजिटल डिटॉक्स: सोशल मीडियाला मर्यादा. ६. तज्ज्ञांची मदत: ही कमजोरी नाही, ही शहाणपणाची खूण आहे.

निरोगी मन - आनंदी जीवन- मानसिक आरोग्य म्हणजे फक्त आजार नसणे नव्हे, तर सकारात्मक विचार, स्थिर मन आणि आनंदी जीवनशैली आहे. मानसिक समस्या लाजेचा विषय नाही. मदत मागणे म्हणजे धैर्य. निरोगी मन असेल तरच जीवनाचा खरा आनंद मिळतो. चला, आजपासून ठरवूया - ''निरोगी मन, निरोगी जीवन'' हाच आपला मंत्र.

## निवडक

### प्रमोद भगतला 'ट्रिपल गोल्ड'

**नायजेरिया :** भारताचा अव्वल पॅरा बॅडमिंटनपटू प्रमोद भगतने नायजेरियातील पहिल्या अॅबिया पॅरा बॅडमिंटन आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आपला उत्कृष्ट फॉर्म कायम राखत तीन सुवर्ण पदके जिंकली आणि पॅरा बॅडमिंटन सर्किटमधील आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले. प्रमोदने या स्पर्धेत पुरुष एकेरी, पुरुष दुहेरी आणि मिश्र दुहेरी अशा तीन इव्हेंटसमध्ये अव्वलस्थान काबीज करत नवा इतिहास रचला. भगतने पुरुष एकेरीतील अंतिम सामन्यात देशबांधव मंटू कुमारला २१-७, ९-२१, २१-९ अशा तीन गेममध्ये पराभूत करत पुरुष एकेरीचे विजेतेपद पटकावले. त्यानंतर त्याने सुकांत कदमसोबत जोडी जमवत दुसरे सुवर्णपदक जिंकले. या जोडीने पेरूच्या गेर्सन जायर वर्गास लोस्टॉनाऊल आणि डायना रोजास गोलासला पराभूत केले. हाच धडाका कायम ठेवत त्याने मिश्र दुहेरीत आरतीसोबत आणखी एक रोमांचक अंतिम सामना जिंकून तिसरे सुवर्णपदक निश्चित केले.

### इस्माईलची विभागीय कॅरम स्पर्धेसाठी निवड



**कोलाड :** रायगड जिल्हास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धा द. ग. तटकरे कॉलेज माणगाव येथे नुकतीच संपन्न झाली. जिल्ह्यातून ६४ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. माणगांव येथे झालेल्या कॅरम स्पर्धेचा अंतिम सामन्यात इस्माईलचा दुसरा क्रमांक आला असून याची निवड विभागीय स्पर्धेसाठी झाली आहे. पुढील स्पर्धा ठाणे येथील सतीश प्रधान ज्ञान साधना कॉलेज ठाणे येथे ९ ऑक्टोबर रोजी होणार आहे. पुढील स्पर्धेसाठी श्रीमती गीता द. तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वरसगाव खेळाडूंना मार्गदर्शन गोविंद कौलगे, शिवाजी मेंडे करीत आहेत. या यशा बद्दल संस्थेचे विश्वस्थ संदीप तटकरे, प्रकाश सर्कले, प्रा. संतोषकुमार भालेराव, प्रणय इंगळे, अमोल पवार, जयकुमार गायकवाड, निधी जाधव, वैदही जगदाळे, दिपाली सोनमळे ,अजित देशमुख, राम पोळेकर,अर्चना साटम, रमेश महाले, विदुला करंबे, वैभव ठाकूर, सुशील कुचेकर यांनी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत दहा पदके

**कोलाड :** पिंपरी चिंचवड येथे रविवार (दि.५) ऑक्टोबर रोजी झालेल्या राज्यस्तरीय मिक्स बॉक्सिंग स्पर्धेमध्ये गोवे गावची वैदेही जाधव ही कांस्यपदकाची मानकरी ठरली असून तिची ओडिसा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या मिक्स बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. पिंपरी चिंचवड येथे झालेल्या राज्यस्तरीय सह्याद्री मार्शल आर्टस् असोसिएशन रायगड जिल्हा संघाने एकूण १० पदकांची कमाई केली असुन या स्पर्धेत आरुष सानप, स्वरूप शिर्के, मनस्वी खांडेकर, यांना सुवर्णपदक, सात्विक बिरगावले, अनुप नाकते, क्षितिज गावडे, आदित्य लोखंडे यांना रौप्यपदक, तर वैदेही जाधव, जुई मोरे, सारस दहिंबेकर यांना कांस्यपदक पटकावले असून या स्पर्धेत सुवर्णपदक, रौप्यपदक व कांस्यपदक पटकाविले आहे. या सर्व विजेत्या खेळाडूंची ओडिसा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरीय मिक्स बॉक्सिंग करीता निवड झाली आहे. सर्व विजयी खेळाडूंचे, प्रशिक्षकांचे, तसेच मार्गदर्शकांचे विविध स्तरावरून अभिनंदन करण्यात येत आहे.

## जिल्हा क्रिकेट असो.साठी ऐतिहासिक दिवस

# साचीची एमसीए स्टेट पॅनलमध्ये निवड

**क्रिकेट इतिहासातली पहिली महिला पंच**

| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील खारघर येथील महिला क्रिकेटपटू साची सुधीर बेलोसे हिने महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित केलेल्या स्टेट पॅनल पंच परीक्षा उत्तीर्ण झाली आहे. रायगडच्या क्रिकेट इतिहासातली पहिली महिला पंच होण्याचा मान मिळवला आहे. साची हिला एमसीए स्टेट पॅनेल पंच परीक्षेत ८२ टक्के गुण प्राप्त झाले आहेत. प्रॅक्टिकल परीक्षेत तिला २० पैकी २० गुण मिळाले असून तिने प्रॅक्टिकल परीक्षेत तिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. एमसीएच्या वतीने स्टेट पॅनल पंच परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. संपूर्ण कोकण विभागातून साची ही एकमेव महिला पंच म्हणून स्टेट पॅनल पंच परीक्षा उत्तीर्ण केली आहे. साची ही एक उत्तम क्रिकेट खेळाडू असून तिने रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या १५,१९,२३ व वरिष्ठ महिलांच्या संघात स्थान मिळवले आहे.



रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने जिल्ह्यातील क्रिकेट पंचांसाठी १०० दिवसांचे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी घेतलेल्या पुढाकाराचे हे फलित असल्याचे तिने सांगितले. आरडीसीएचे मार्गदर्शक व क्रिकेट नियमांचे तज्ञ नयन कट्टा, बीसीसीआय पंच व माजी रणजी ट्रॉफी खेळाडू हर्षद रावले,एमसीए (मुंबई) पंच राजन कसबे यांनी जिल्ह्यातील पंचाना बहुमूल्य मार्गदर्शन केले आहे.आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, उपाध्यक्ष यशवंत साबळे, राजेश पाटील, संतोष भोईर, सचिव प्रदीप नाईक, जयंत नाईक, बशीर चिचकर, प्रशांत ओक,आरडीसीएचे अॅड.पंकज पंडित, समीर मसुरकर, प्रदीप खलाटे, कौस्तुभ जोशी, मुख्य प्रशिक्षक शंकर दळवी यांनी साचीचे अभिनंदन केले आहे.

> महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने महिलांसाठी स्टेट पॅनल पंच परीक्षेचे आयोजन करून महाराष्ट्रातील महिलांना क्रिकेट क्षेत्रात पंच होण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल एमसीएचे आभार, तसेच आरडीसीएच्या वतीने जिल्ह्यातील पंचांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून जिल्ह्यातील पंचाना उत्तम दर्जाचे मार्गदर्शन मिळाले.
> -साची बेलोसे

गेल्या एक वर्षाच्या कालावधीत जिल्ह्यातील १२ पंचांनी एमसीए पंच पॅनेलसाठी पात्रता मिळवली असून ११ अधिकृत एमसीए स्टेट पॅनेल स्कोअरर्स कार्यरत आहेत.ही रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनची मोठी कामगिरी म्हणावी लागेल. रायगड जिल्ह्यात क्रिकेट खेळाचा दर्जा वाढवण्यासाठी चांगल्या दर्जाचे पंच व स्कोअरर्स तयार करणे गरजेचे आहे त्यासाठी आरडीसीए सातत्याने परिश्रम घेत आहे. जिल्ह्यातील विविध वयोगटातील मुला- मुलींची निवड महाराष्ट्राच्या संघात होत असून पुरुषांना बरोबर महिला पंच व स्कोअरर्स देखील एमसीए मध्ये कार्यरत होत असल्याचा आपल्या आनंद असल्याचे जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी सांगितले. साची बेलोसे हिने एमसीए स्टेट पॅनल पंच परीक्षा उत्तीर्ण केलेल्या नंतर तिला संपूर्ण जिल्ह्यातून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

### श्री ची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

| अलिबाग | प्रतिनिधी |



रेवस-नवखारचा कराटेपट्टू श्री पाटील याची पंजाबचा पारंपरिक खेळ गतका मार्शल आर्ट या खेल प्रकारात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करेल श्री हा रायगडचा एकमेव विद्यार्थी आहे.

या स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या मुलांची खेलो इंडियासाठी निवड होईल. प्रशिक्षण संतोष कवळे, मानसी प्रदीप पाटील, जिज्ञासा सुधीर रोहन गुरव याचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धा ९ ते १२ ऑक्टोबर या दरम्यान नवी दिल्लीमध्ये होतील. श्री ची निवड झाल्याबद्दल हेमंत पाटील. प्रकाश पाटील, वैशाली पाटील, प्रगती बरे, नथुराम पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, सचिन पाटील, जितेंद्र पाटील वीरेंद्र पाटील यांनी त्याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.



● (छायाचित्र : समीर मालोदे)

जिल्हा क्रीडा अधिकारी आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल येथे शालेय जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

## पॅरा ऑलिंपिक स्विमिंग स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक

# सेलिब्रल पलसग्रस्त ऋषिकेशची कहाणी

| म्हसळा | प्रतिनिधी |

पॅरा ऑलिम्पिक स्विमिंग स्पर्धेत. १७ व्या पॅरा ऑलिम्पिक स्विमिंग स्पर्धेत म्हसळ्याचा सेलिब्रल पलसी ग्रस्त ऋषिकेश माळीने तिसरा क्रमांक पटकावला आहे. नुकत्याच संभाजी नगर येथे पार पडलेल्या राज्य स्तरीय पॅरा ऑलिंपिक स्विमिंग स्पर्धेमध्ये सिनियर मेन्स ५० मीटर, फ्री स्टाईल या प्रकारात (एस् ४) या गटात सेरेब्रल पाल्सी या असाध्य आजाराने ग्रस्त असलेल्या ऋषिकेश शितल सुदाम माळी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत मोठं यश मिळवलं आहे. म्हसळामधील या मुलाने स्विमिंग स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळवून सेरेब्रल पाल्सी ग्रस्त पाल्य व पालक यांना एक नवीन मार्ग दाखवला आहे.

स्विमींग स्पर्धा भारतीय ऑलिंपिक संघटना याच्याशी संलग्न महाराष्ट्र राज्य पॅरालिम्पिक असोशिएशन आणि औरंगाबाद-संभाजी नगर डिस्ट्रिक्ट पॅरालिम्पिक असोसिएशन द्वारा आयोजित सिद्धार्थ जलतरण तलाव येथे पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन पालक मंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते झाले. या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्यातील जवळपास २०० स्पर्धकांनी ज्यूनियर, सिनियर मेन वुमेन यांच्या विविध इव्हेंट मध्ये एस. १ ते एस. १४ या विविध गटातून विविध दिव्यांग प्रकारच्या दिव्यांग स्पर्धकांनी भाग घेतला.



म्हसळामधील डोंगरी भागात राहणाऱ्या ऋषिकेशने आपल्या इच्छा शक्तीच्या जोरावर सेरेब्रलपाल्सी असताना देखील,स्विमिंगच्या कोणत्याही सोई सुविधा नसताना अनेक अडचणींवर मात केली. शरीराच्या वाढत्या स्पास्टीसीटी वर मात करत, स्विमिंगसाठी जसा वेळ मिळेल तसा सरावासाठी नाशिक येथील जिजामाता तरण तलाव गाठून सराव केला. ऋषिकेशच्या या प्रेरणादायी यशाबद्दल जिजामाता तरण तलावच्या व्यवस्थापक माया जगताप, अर्जुन सोनकांबळे यांनी शुभेच्छा दिल्या.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)